# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### ताडोबा, नवेगाव, मेळघाट, पेंच इत्यादी व्याघ्र प्रकल्पामध्ये वन संवर्धन आणि विशेष व्याघ्र संरक्षण दलाचे जवान व मजूर वेतनापासून वंचित असल्याबाबत

**(१) ३४९७४ (१७-०१-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडोबा, नवेगाव, मेळघाट व पेंच इत्यादी व्याघ्र प्रकल्पामध्ये वन संवर्धन आणि व्याघ्र संवर्धनात मोलाची भूमिका बजावणारे विशेष व्याघ्र संरक्षण दलाचे सुमारे ४४८ जवान माहे एप्रिल, २०२१ पासून आजमितीपर्यंत वेतनापासून वंचित असल्याची धक्कादायक बाब दिनांक २८ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्पात काम करणाऱ्या मजुरांची मजुरीदेखील अद्यापपर्यंत अदा करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, आणि त्यानुषंगाने विदर्भातील या चारही व्याघ्र प्रकल्पातील जवानांचे वेतन व मजुरांची मजुरी अदा करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०५-२०२३) :** (१) सन २०२१-२२ कीरता ताडोबा-अंधारी, मेळघाट, पेंच व नवेगांव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील विशेष व्याघ्र संरक्षण दलात कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या माहे एप्रिल, २०२१ ते माहे जुन, २०२१ या कालावधीच्या वेतनाकरीता वित्त विभागाच्या पूर्व परवानगीने दिनांक ०९.०६.२०२१ रोजीच्य शासन निर्णयान्वये व्याघ्र प्रकल्प या केंद्र पुरस्कृत योजनेतर्गत ४०% राज्य हिस्सा २४०६-A१०२ या लेखाशिर्षांतर्गत रु. ६८३.२५५ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच आवश्यकतेनुसार उर्वरीत कालावधीचे वेतन संबंधित व्याघ्र प्रतिष्ठानद्वारे अदा करण्यात आले आहे.

(२) व्याघ्र प्रकल्पातील विशेष व्याघ्र संरक्षण दलात कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी व विविध संरक्षणाच्या कामाकरीता कार्यरत असलेल्या मजूरांच्या मजूरीचा समावेश करुन व्याघ्र प्रकल्प या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत वार्षिक प्रर्वतन अहवाल केंद्र शासनास मंजूरीसाठी सादर करण्यात येतो.

सन २०२१-२२ करीता व्याघ्र प्रकल्प या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत ताडोबा-अंधारी, मेळघाट, पेंच व नवेगांव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाकरीता मंजूर करण्यात आलेल्या वार्षिक प्रर्वतन अहवालानुसार केंद्र शासनाकडून प्राप्त केंद्र हिस्सा व त्याअनुरुप राज्य हिस्याकरीता एकूण रु. २८२१.६९७ लक्ष निधी वित्त विभागाच्या पूर्व परवानगीने वितरीत करण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरातील नारा जैव विविधता उद्यान निर्मिती कामांमध्ये**
**स्थानिक रोजगारांना विशेष प्राधान्य देण्याबाबत**

**(२) ३५३५९ (०२-०२-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील नारा जैव विविधता उद्यानामुळे शहरालगतची निसर्ग भ्रमंतीची संधी नागपूरकरांना प्राप्त होणार असून प्रस्तावीत उद्यान निर्मितीच्या कामांमध्ये स्थानिक रोजगारांना विशेष प्राधान्य देण्यात यावे, अशी सूचना पालकमंत्री, नागपूर यांनी माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिकांना रोजगार देण्याबाबत संबंधित प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०६-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे. नागपूर शहारातील नारा येथील प्रस्तावित केलेल्या उद्यान निर्मितीच्या कामामध्ये स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होईल यासाठी प्राधान्य देण्यात यावे असे निर्देश तत्कालीन मा. पालकमंत्री नागपूर यांनी दिनांक ०५/०४/२०२१ रोजीच्या बैठकीत दिले होते.

(२) नारा येथील कामांच्या संदर्भात खालील प्रमाणे निधी प्राप्त झाला आहे.

१. "नगर वन" या केंद्र योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून रु. ६५.०० लक्ष निधीची मान्यता प्राप्त असून त्यापैकी पहिला हप्ता रु. ४५.७१ लक्ष प्राप्त झालेला आहे.

२. राज्य शासनाकडून वृक्ष लागवडी करिता रु. ३३.०२ लक्ष निधी प्राप्त झाला आहे.

३. जिल्हा नियोजन समिती, नागपूर यांच्याकडून रु. ९.०० लक्ष प्राप्त झाले. नारा उद्यान, नागपूर येथील विविध विकास कामांची अंमलबजावणी करण्याकरिता नागपूर वन विभागामार्फत बृहत योजना आराखडा तयार करण्यात आला असून उपवनसंरक्षक, नागपूर कार्यालयाकडून मंजूरीसाठी पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील बाबूपेठ येथील शहरालगतच्या जंगलात वन कर्मचारी यांनी केलेल्या बेदम मारहाणीबाबत**

**(३) ३५९३८ (११-०१-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील बाबूपेठ येथील सुरेंद्र देवाळकर, किशोर ठाकूर व विलास मुत्तावर हे तिघे शहरालगतच्या जंगलात घरगुती उपयोगासाठी बांबू आणण्यासाठी माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान गेले असता वन विभागाचे कर्मचारी बालाजी राठोड यांनी त्यांना मारहाण केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरेंद देवाळकर हे जखमी झाल्यानंतर उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मारहाणीत वनरक्षक राठोड यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व संबंधित वनरक्षकावर आतापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०६-२०२३) :**(१) (२) (३) हे खरे आहे.

दि.२७.०९.२०२१ रोजी चंद्रपूर जिल्हयातील जुनोना जंगल परिसरात श्री.किशोर रायबहादूर सिंग ठाकूर व त्यांचे ३ सहकारी बांबू तोडून ठेवल्या ठिकाणी बांबू जमा करीत होते. तेवढ्यात त्याठिकाणी श्री.बालाजी राठोड (वनरक्षक) हे तिन लोकांसोबत येऊन, "तुम्ही जंगलातील बांबू कसे काय तोडत आहात", असे विचारुन तोडलेला बांबू उचलून श्री. किशोर रायबहादूरसिंग व श्री.सुरेंद्र देवाळकर यांना श्री.बालाजी राठोड यांनी मारहाण केली. वनरक्षक श्री.बालाजी राठोड यांनी केलेल्या मारहाणीमुळे श्री.सुरेंद्र देवाळकर यांचा मृत्यू झाल्याची तक्रार श्री.किशोर रायबहादूरसिंग ठाकूर यांनी

फिर्यादी म्हणून दिली व त्यानुसार रामनगर पोलीस ठाणे, चंद्रपूर येथे दि.०१.१०.२०२१ रोजी गुन्हा नोंद क्र.९८४/२०२१, भा.द.वि. कलम ३०२, ३२४, ३२३ अन्वये श्री.बालाजी राठोड (वनरक्षक) यांचेविरुध्द गुन्हा नोंदविण्यात येऊन श्री.बालाजी राठोड (वनरक्षक) यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली होती. सदर प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

(४) सहायक पोलीस निरीक्षक, चंद्रपूर पोलीस ठाणे यांचे अहवालानुसार श्री.बालाजी राठोड यांना अटक करण्यात आली होती. त्यानुसार विभागीय व्यवस्थापक, पश्चिम चांदा वनप्रकल्प विभाग, चंद्रपूर यांच्या दि.२५.१०.२०२१ च्या कार्यालयीन आदेशान्वये श्री.बालाजी राठोड (वनरक्षक) यांना मानीवरित्या निलंबित करण्यात आले होते. दि.२५.०५.२०२२ च्या आदेशान्वये त्यांना सेवेत पुन:स्थापित करण्यात आले असून शिस्तभंगविषयक कार्यवाहीसंबंधी चौकशी अधिकारी यांचा अहवाल प्राप्त झाला असून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोर्बे धरण प्रकल्पग्रसताच्या असलेल्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(४) ३७००१ (१२-०१-२०२२). श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोर्बे धरण प्रकल्पग्रस्तांना नुकसान भरपाई म्हणून जमिनीची किंमत त्यावेळी रू. ६५,००० इतकी अनुदानासह लेखी देण्याचे कबूल करून सुद्धा रू. १०,००० ते १५,००० इतका कमी भाव व अनुदान दिले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन मदत व पुनर्वसन मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या सोबत संबंधित विषयासंदर्भात माहे जुलै, २०१९ मधे वा त्यादरम्यान झालेल्या बैठकीत शिल्लक असलेल्या जमिनीचा सर्व्हे करण्याचे तसेच प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीस शासकीय नोकरी देण्याचे आश्वासन देऊन सुद्धा त्याची पूर्तता झाली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०६-०६-२०२३) :** (१) अशी बाब नाही. तथापी, मा. न्यायालयाने कलम १८ खाली दिलेल्या आदेशाच्या आधारे कलम २८(अ) व कलम २८ (अ) (३) प्रमाणे प्रकरणे खातेदार यांजकडून दाखल केली जातात. सदर प्रकरणामध्ये अंतीम निवाडे तयार करुन नवी मुंबई महानगरपालिका यांजकडे निवाडयाचे रकमेची मागणी करुन रक्कम प्राप्त होताच संबंधीतास वाढीव मोबदला अदा करण्याची कार्यवाही वेळोवेळी करण्यात येत आहे. मोर्बे धरण प्रकल्पग्रस्तांना नुकसान भरपाई म्हणून जमिनीची किंमत रु.६५०००/- इतकी अनुदानासह लेखी देण्याचे कबुल केलेले नाही. तथापी, मोर्बे धरण भूसंपादनासाठी व वाढीव मोबदला अदा करणेकामी रक्कम रुपये ४१.०१ कोटी प्रकल्पग्रस्त खातेदाराना अदा करण्यात आली आहे.

(२) मोर्बे धरण प्रकल्पाबाबत मा. मंत्री, मदत व पुनर्वसन यांचे अध्यक्षतेखाली दि.०८/०७/२०१९ रोजी बैठक झाली होती. सदर बैठकीमध्ये मोर्बे धरणासाठी संपादीत केलेल्या जमिनीपैकी किती जमिन धरणासाठी वापरण्यात आली आहे. त्याबाबत, तांत्रिक संस्थेमार्फत सर्वेक्षण करुन विनावापर शिल्लक असलेल्या जमिनीबाबत अहवाल सादर करणेबाबत तसेच पुनर्वसन यंत्रणा, पुनर्वसन अधिकारी व प्रकल्पग्रस्तांचे प्रतिनीधी यांनी पुनर्वसीत गावठाणांची संयुक्त पहाणी करुन नागरी सुविधांबाबत तसेच वाटप करण्यात आलेल्या भूखंडाबाबत अहवाल सादर करणेबाबत निर्देश दिले होते. यामध्ये प्रत्येक कुटूंबातील एका व्यक्तीस शासकीय नोकरी देणेबाबत कबुल करण्यात आले नव्हते.

(३) नवीमुंबई महानगरपालिका यांजकडून मोबदला अदा करणेकामी ४१.०१ कोटी प्रकल्पग्रस्त खातेदाराना अदा करण्यात आली आहे. मोर्बे धरण प्रकल्पग्रस्तामधून एकुण ५८ कंत्राटी कामगारांना दि.१९.११.२०१२ पासून नवी मुंबई

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायम स्वरुपी कर्मचारी म्हणून सामावून घेण्यात आलेले आहे असे नवी मुंबई महानगरपालिका यांजकडून कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वढोदा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) वनक्षेत्र परिसर पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्याबाबत**

**(५) ४३१७१ (०९-०४-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वढोदा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) वनक्षेत्र परिसरात वाघांकरिता भक्ष्य व पाणवठयांची सोय असल्याने मध्यप्रदेशातील वाघांचा या भागात वावर असल्याने सदर परिसर व्याघ्र संवर्धन परिसर घोषित करणे तसेच येथे टायगर सफारीची व्यवस्था करुन जागतिक पर्यटकांना आकर्षित करण्याच्यादृष्टीने पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याकरिता स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण करुन कायमस्वरुपी निधीची तरतूद करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०५-२०२३) :** (१) जळगाव जिल्ह्यातील १२२.७४० चौ. कि.मी. क्षेत्र दिनांक ०३.०५.२०१४ रोजीच्या शासन अधिसूचनेन्वये मुक्ताई भवानी संवर्धन राखीव क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे.
सदर क्षेत्रातील वाघाचा वावर तसेच अन्य वन्यजीवांसाठी पोषक अधिवास विचारात घेऊन येथे मुक्ताई भवानी वन्यजीव अभयारण्य घोषित करण्याच्या प्रस्तावास महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाच्या दिनांक ०६.०६.२०२२ रोजी संपन्न झालेल्या १८ व्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
उपरोक्त १२२.७४० चौ. कि.मी. क्षेत्र अभयारण्य म्हणून अधिसूचित झाल्यानंतर सदर क्षेत्राचा वन्यजीव व्यवस्थापन आराखडा तयार करतेवेळी वन्यजीव व्यवस्थापनाबाबत आवश्यक बाबी समाविष्ट करुन आराखडा मंजूर करुन घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यात येते.
(२) सदर क्षेत्राचे विकासाकरीता सन २०२१-२२ मध्ये कॅम्पा अंतर्गत रु. १७८.१० लक्ष व जिल्हा वार्षिक योजनांतर्गत रु. ३५.९५ लक्ष निधी प्राप्त झाला असून सदर निधी खर्च देखील करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करंदी, (ता. शिरूर जि.पुणे ) येथे बिबटयाचा वावर होत असल्याबाबत**

**(६) ४५१३४ (२०-०९-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करंदी, (ता. शिरूर जि.पुणे ) येथील सीताराम कंदुप यांच्या शेतात ऊसतोड सुरु असताना ऊसतोड कामगारांना चार बिबट्याची पिल्ले निदर्शनास आल्यामुळे तेथील शेतकरी आणि शेतमजूर यांच्यामध्ये भीतीचे सावट निर्माण झाल्याचे दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२). असल्यास, उक्त परिसरातील शेतांमधील बिबट्या आणि इतर वन्य प्राण्यांचा वाढता वावर आटोक्यात आणण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबांची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०५-२०२३) :** (१) दिनांक १४.०३.२०२२ रोजी जुन्नर वनविभागातील मौजे शिरुर येथील श्री. विठ्ठल बबन कुंदुप यांचे मालकीचे गटात ऊस तोडणी सुरु असताना सदर क्षेत्रात आढळून आलेली बिबट्याची पिल्ले

शिरुर वनपरिक्षेत्रातील वनरक्षक करंदी, वनमजूर व रेस्क्यु टिम यांच्या सहभागाने प्रमाणभुत कार्यपध्दतीचा अवलंब करुन ताब्यात घेण्यात आली आहेत.

(२) मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे, पशुधनांचे नुकसान झाल्यास अथवा मनुष्य जखमी / मृत्युच्या घटना झाल्यास प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाई अदा करण्यात येते.
- वन्यप्राण्यानी केलेल्या नुकसानीची भरपाई अदा करण्याकरीता उणे (-) प्राधिकाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती.
- बिबट प्रवण क्षेत्रात वनकर्मचाऱ्यामार्फत नियमित गस्त घालून लगतच्या क्षेत्रातील ग्रामस्थांचे जनजागृतीद्वारे प्रबोधन करण्यात येते.
- वन्यप्राणीमुळे मानवी जिवीतास धोका उद्भवल्यास प्रचलित नियमातील तरतुदीनुसार सदर वन्यप्राण्यास जेरबंद करुन नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात येते.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता वनक्षेत्रात कृत्रिम पावणवठे, वनतळी व चेकडॅमची निर्मिती करुन त्यात बारमाही पाणी उपलब्ध होईल याची खातरजमा करण्यात येते
- स्थानिक लोकांच्या सहभागातुन जलद बचाव पथकांची निर्मिती करण्यात आली आहे.
- वन्यप्राण्यांकरीता पुणे वनवृत्तात मौजे बावधान येथे वन्यप्राणी बचाव केंद्र उभारण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे बदलापूर (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील सर्व्हे नं.२५०/४/ब मिळकतीबाबत

**(७) ४५८७६ (०३-११-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बदलापूर (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील सर्व्हे नं. २५०/४/ब मिळकतीबाबत न्यायालयात रिट पिटीशन याचिका क्र.५४९८/२०२० अन्वये दाखल असताना सौ.विना मिलिंद जोशी यांना विश्वासात न घेता दत्तात्रय कृष्णा लवाटे यांना मुंबई-वडोदरा रस्त्याच्या भूसंपादनाची रक्कम दिल्याचे दाखवून दिनांक २० ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांनी सदर रक्कमेतील सुमारे ६,३८,८५,०४८ इतकी रक्कम इंडसइंड बँक लि. उल्हासनगर शाखा यांना लेखी पत्र देऊन तीन एजंटमार्फत स्वत: पैसे काढून घेतल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने संबंधित दोषी तत्कालीन उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर व त्यांचे तीन एजंट यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०५-०६-२०२३) :** (१) सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. ५४९८/२०२० प्रकरणी दि. १८.०१.२०२१ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे उप विभागीय अधिकारी, उल्हासनगर यांनी विद्याधर दत्तात्रेय लवाटे यांचे तीन कुलमुखत्यार यांना खालीलप्रमाणे भूसंपादन मोबदला अदा केला आहे.

१. श्री. अभिजित रमेश खडकबाण रु.२,१२,९५,०१६/-

२. श्री. अभय शशिकांत तावडे रु.२,१२,९५,०१६/-

३. श्री. सुभाष दळवी रु.२,१२,९५,०१६/-

(२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी सुप्रिया रामचंद्र लवाटे व इतर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे अवमान याचिका क्र.३०/२०२० दाखल केली असून प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.

---

### सोलापूर जिल्ह्यातील वनविभागाकडून बिबट्याला पकडण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(८) ४६००९ (२५-०९-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाविंदगी (ता.अक्कलकोट जि.सोलापूर) या परिसरात मादी बिबट्या आपल्या बछड्यासह निदर्शनास आल्याने या परिसरात बिबट्याची दहशत पसरल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बिबट्याला पकडण्यासाठी वन विभागाने अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यतील नागरिकांच्या सुरक्षेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०५-२०२३) :** (१) मौजे नाविंदगी ता. अक्कलकोट, जि. सोलापूर येथील श्री. सचिन हिरेमठ यांचे केळीचे शेतात बिबट आढळून आल्याची माहिती मिळताच उपवनसंरक्षक, सोलापूर, सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो), सोलापूर, वनपरिक्षेत्र अधिकारी रोहयो सोलापूर व वनकर्मचारी यांनी घटना स्थळी जावून सदर बिबट्याला प्रचलित नियमांचे पालन करुन नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले आहे.

मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे, पशुधनांचे नुकसान झाल्यास अथवा मनुष्य जखमी / मृत्युच्या घटना झाल्यास प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाई अदा करण्यात येते.
- वन्यप्राण्यानी केलेल्या नुकसानीची भरपाई अदा करण्याकरीता उणे (-) प्राधिकाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती.
- बिबट प्रवण क्षेत्रात वनकर्मचाऱ्यामार्फत नियमित गस्त घालून लगतच्या क्षेत्रातील ग्रामस्थांचे जनजागृतीद्वारे प्रबोधन करण्यात येते.
- वन्यप्राणीमुळे मानवी जिवीतास धोका उद्भवल्यास प्रचलित नियमातील तरतुदीनुसार सदर वन्यप्राण्यास जेरबंद करुन नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात येते.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता वनक्षेत्रात कृत्रिम पावणवठे, वनतळी व चेकडॅमची निर्मिती करुन त्यात बारमाही पाणी उपलब्ध होईल याची खातरजमा करण्यात येते
- स्थानिक लोकांच्या सहभागातुन जलद बचाव पथकांची निर्मिती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दौंड तालुक्यातील बिबट्याच्या हल्ल्यात मेंढ्या मृत्युमुखी पडल्याबाबत

**(९) ४७८७७ (२५-०९-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दहिटणे देवकरवाडी (ता.दौंड, जि.पुणे) हद्दीत बिबट्याने केलेल्या हल्ल्यात सुमारे २६ मेंढ्यांचा मृत्यू झाल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिबट्याच्या हल्ल्यात पाळीव प्राण्यांच्या मृत्यू होण्याच्या अनेक घटना यापूर्वी देखील घडलेल्या असून, त्याला प्रतिबंध घालण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधीनी वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०५-२०२३) :** (१) दिनांक २८.०५.२०२२ रोजी पुणे वनविभागातील दौंड वनपरिक्षेत्रातील मौजे दहिटणे येथिल श्री. संपत सामनाथ थोरात यांच्या मालकीच्या कोकरु-२३ व शेळी करडे-३ असे एकूण २६ पशुधन बिबट्याच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडल्याची घटना निदर्शनास आली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) पुणे वनविभागातील दौंड वनपरिक्षेत्रात सन २०२१-२२ मध्ये वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात पशुधन हानीची १२४ प्रकरणे व शेतपिक नुकसानीची २ प्रकरणे प्राप्त झाली असून प्रस्तुत प्रकरणांमध्ये प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित नुकसान ग्रस्त व्यक्तीस अनुक्रमे रु. ९,३६,७००/- व रु. २०,०००/- नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**समृध्दी महामार्गाला जोडणाऱ्या जालना ते नांदेड या द्रूतगती महामार्गासाठी परभणी जिल्ह्यातील भूसंपादनाच्या प्रक्रियेबाबत**

**(१०) ५०२२७ (२४-०१-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गाला जोडणाऱ्या जालना ते नांदेड या द्रूतगती महामार्गासाठी परभणी जिल्ह्यातील किती जमीन संपादीत करण्यात येणार आहे,
(२) असल्यास, जमीन संपादित करण्यासाठी किती कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत,
(३) असल्यास, भूसंपादनाची प्रक्रिया सुरु झाली आहे काय वा याबाबत सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०६-०६-२०२३) :** (१) परभणी जिल्हयातील ९३.५० कि. मी. (एकूण लांबी) रस्ता मार्गासाठी एकूण ९३१.४९ हेक्टर आर. इतकी जमीन संपादीत करण्यात येत आहे.
(२) परभणी जिल्हयातील या रस्त्यासाठी संपादीत होणाऱ्या जमिनीच्या आवश्यक अंदाजित निधी रुपये ४४५ कोटी रकमेची मागणी मुख्य महाव्यवस्थापक (भूमि व सर्वेक्षण) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेकडे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांनी कार्यालयात सादर करण्यात आली आहे. उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांनी दिनांक २१.२.२०२३ च्या पत्रान्वये मागणी केली आहे. या मागणीप्रमाणे अद्याप निधी प्राप्त झालेला नाही.
(३) संपादन होणाऱ्या जमिनीचे मोजणी प्रक्रिया पूर्ण झाली असून जमिनीत असलेल्या इतर बाबी जसे, झाड, विहिर, बोअर, पाईपलाईन इत्यादींचे मुल्यांकन संबंधित विभागाकडून प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण (महाज्योती) संस्थेच्यावतीने केंद्रीय लोकसेवा आयोग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुर्वपरीक्षेसाठी विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या प्रशिक्षणवर्गाबाबत**

**(११) ५०४०१ (२९-०१-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अजित पवार (बारामती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण (महाज्योती) संस्थेच्यावतीने सन २०२२-२३ या वर्षाकरिता केंद्रीय

लोकसेवा आयोग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुर्वपरीक्षेसाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षणवर्ग तसेच मोफत खाजगी कोचिंग देण्यासाठी निवडण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवडीला जवळपास दोन महिन्यांपेक्षा जास्त उशीर झाल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील वर्षी विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले परंतु एमपीएससीच्या अभ्यासक्रमात मोठा बदल करण्यात आला असून २७ वैकल्पिक विषय असल्यामुळे प्रत्येक विद्यार्थी हा वेगळया व एक वैकल्पिक विषयाची निवड करीत असल्याने प्रशिक्षण अवघड जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यातील वेगवेगळया प्रशिक्षण संस्थांना महाज्योती संस्थेने कंत्राट देणे आवश्यक असतांना दिनांक ६ ऑक्टोबर, २०२२ रोजी स्थगिती दिलेल्या पुणे येथील ज्ञानदीप संस्थेला दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी १५ कोटी तसेच १८ कोटी रुपये रक्कमेचे कंत्राट देण्यात आल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) त्याचप्रमाणे एमपीएससीच्या अभ्यासक्रमात २७ वैकल्पिक विषय असून १५०० विद्यार्थ्यांना एकाच संस्थेत प्रशिक्षण देताना गुणवत्ता कशी टिकेल असे प्रश्न विचारले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, एकाच संस्थेत दीड हजार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिल्यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता व अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन मिळण्याची शक्यता नसल्याचे स्टुडन्ट हेल्पिंग हँड संघटनेमार्फत शंका व्यक्त करण्यात आल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(६) तसेच नागपूर येथे महाज्योती संस्थेतर्फे चालविण्यात येणाऱ्या कोचिंग क्लासेस मध्ये कोट्यवधी रूपयांचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (३०-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.

विद्यार्थी निवड प्रक्रीया वेळेत पूर्व करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही

महाज्योतीने निवड केलेल्या प्रशिक्षण संस्थेकडे सुधारित अभ्यास क्रमानुसारच प्रशिक्षण देण्याची सुविधा उपलब्ध असल्याची खात्री करण्यात आली आहे. प्रशिक्षण संस्थेमार्फत १० वैयक्तिक विषयाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. त्यामुळे प्रशिक्षणाची तयारी करणाऱ्या उमेदवारांना त्याचा फायदा होणार आहे.

(३), (४), (५) व (६) हे खरे नाही.

(७) व (८) प्रश्न उद्भवत नाही.

---

**(मौजे कामतघर ता. भिवंडी, जि. ठाणे ) येथील ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या विकासकावर गुन्हे दाखल करण्याबाबत**

**(१२) ५०६७४ (२४-०१-२०२३). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) (मौजे कामतघर ता.भिवंडी, जि. ठाणे) क्षेत्रातील मौजे कामतघर येथे सर्वे क्र. ६३ व १५६ येथे १० मजली इमारत उभारताना विकासकाने एक घर अनेक ग्राहकांना विकून तसेच गहाण ठेऊन ग्राहकांची फसवणूक केल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे पुरावे देऊन सबंधित विकासकावर गुन्हे दाखल करण्याची मागणी माहे सप्टेबंर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सहाय्यक मुद्रांक जिल्हा निबंधक यांना माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिलेले असून अद्यापही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात कोणत्याही भागात एका घराची खरेदी विक्री ही ऑनलाईन प्रणालीवरती दिसते, परंतु उक्त घरांची खरेदी विक्रीची माहिती सहाय्यक मुद्रांक निबंधक, भिवंडी यांना ऑनलाईन प्रणालीवरील नोंद न दिसण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने संबंधित विकासकावर गुन्हा दाखल करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०६-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) विकासकाने एक घर दोन व्यक्तींना विक्री केल्याची एकूण ६ प्रकरणे आढळून आली आहेत. तसेच त्यानुसार पडताळणी केली असता गहाणखताचा दस्त क्रमांक ५३११/२०२१ यावर न्युन मुद्रांक शुल्काची आकारणी करण्यात आल्याचे आढळल्यामुळे संबंधित पक्षकार यांस सह दुय्यम निबंधक वर्ग-२, भिवंडी क्र. २ यांनी दि.१०.०८.२०२२ रोजी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ मधील तरतुदीनुसार वसुलीची नोटीस बजाविण्यात आलेली असून वसुलीची कार्यवाही सुरु आहे.
(३) राज्यात कोणत्याही भागात एका घराची खरेदी-विक्री ही ऑनलाईन प्रणालीवर दिसते. परंतु उक्त दस्तांच्या नोंदी तपासून/पडताळून नोंदणी करण्याची तरतूद नोंदणी अधिनियमात अथवा नियमात नमूद केलेली नसल्याने सह दुय्यम निबंधक,भिवंडी यांनी विषयांकित प्रकरणी दस्ताच्या मिळकती संदर्भात पडताळणी करणे अभिप्रेत नाही.
(४) मालमत्ता हस्तांतरण अधिनियमाचे कलम ५४ व ५५ चे तरतुदीप्रमाणे दस्तात नमूद मिळकतीचे मालकी हक्क पडताळण्याची जबाबदारी दस्त निष्पादकांची आहे. नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ५७ नुसार विहीत अर्ज व विहीत फी भरुन नोंदणीकृत दस्तांचा शोध घेणेची सुविधा उपलब्ध आहे. याखेरीज नोंदणी विभागाचे संकेतस्थळ www.igrmaharashtra.gov.in यावर ऑनलाईन सर्च सुविधा उपलब्ध आहे. तेथेही पक्षकारांना स्थावर मालमत्तेसंबंधी नोंदणीकृत दस्तांचे अभिलेख अवलोकन करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
प्रस्तुत प्रकरणात सह जिल्हा निबंधक वर्ग-१,ठाणे ग्रामीण कार्यालयाने प्राथमिक चौकशी केली असता त्यामध्ये एक सदनिका दोन व्यक्तींना विक्री केल्याची ६ प्रकरणे आढळून आलेली आहेत. मात्र त्यामध्ये नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२/८३ चा भंग झाल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास येत नसल्याने यामध्ये या विभागामार्फत गुन्हा नोंद करण्याचा प्रश्न उदभवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर - बीड- परळी या रेल्वे मार्गाकरिता शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूसंपादन करण्याबाबत

**(१३) ५११९८ (२७-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर- बीड- परळी या रेल्वे मार्गासाठी सन २०१५ या कालावधीपासून बीड जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूसंपादन करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१५ ते २०१९ या कालावधीमध्ये किती शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूसंपादन करण्यात आले तसेच एकुण संपादित केलेल्या जमिनीपैकी अकृषी जमिनीचे क्षेत्र व शेतकऱ्यांची संख्या किती आहे व यामध्ये जाणीवपूर्वक शेत जमिनीचे अकृषी जमीनीत रूपांतर करून अतिरिक्त भूसंपादन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय , त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०५-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सन २०१५ ते आजतागायत बीड जिल्ह्यातील अहमदनगर-बीड-परळी वै नवीन रेल्वे मार्गासाठी अतिरिक्त भूसंपादनासाठी एकुण ६९ गावामध्ये ३५३.२८९२ हे.आर. प्रस्तावित क्षेत्र होते. त्यापैकी ३४५.०७ हे.आर. क्षेत्र संपादनाच्या स्तरावर आहे. जमीन संपादित करण्यात आलेल्या एकुण शेतकऱ्यांची संख्या २२४४ असून त्यापैकी अकृषिक जमीन संपादन करण्यात आलेल्या शेतकऱ्यांची संख्या १२ असुन क्षेत्र ५.९८६१ इतके आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अप्पर पैनगंगा (ता.धर्माबाद, जि.नांदेड) प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला मिळाला नसल्याबाबत**

**(१४) ५२३१५ (१८-०१-२०२३). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अप्पर पैनगंगा (ता.धर्माबाद, जि.नांदेड) प्रकल्प ईसापूर उजव्या कालव्यावरील करखेली शाखा डावी लघु वितरिका क्र.२ चिकना येथून जात असून ज्या शेतक-यांच्या जमिनीतून हा कालवा जात आहे त्या शेतक-यांना नोटीसा न देता चुकीच्या शेतक-यांना नोटीसा देण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रामजी लालू इस्नेकर या शेतक-याने दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास उपअधिक्षक भूमी अभिलेख, धर्माबाद तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, उपजिल्हाधिकारी, धर्माबाद कार्यकारी अभियंता उर्ध्व पैनगंगा प्रकल्प ८ नांदेड, तहसिल कार्यालय, धर्माबाद या सर्वांना अर्ज दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जमिनीची संयुक्त मोजणी अहवाल सादर करुन ४ वर्षे होऊनही रामजी लालू इस्नेकर यांना अद्याप शेतीचा मोबदला मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्याअुनषंगाने शेतक-याला जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०५-०६-२०२३) :** (१) अप्पर पैनगंगा (ता. धर्माबाद, जि.नांदेड) प्रकल्प ईसापूर उजव्या कालव्यावरील करखेली शाखा डावी लघु वितरीका क्र.२ चिकना या प्रकरणात अंतिम निवाडा दि.२०.०२.२०२२ रोजी झाला असून त्यामध्ये संयुक्त मोजणीनुसार संबंधित खातेदारास नोटीस देण्यात आलेल्या आहेत.

(२) हे खरे आहे. अर्जदार श्री रामजी लालू इस्नेकर यांनी आक्षेप अर्ज दिलेले आहेत.

(३) व (४) श्री रामजी लालू इस्नेकर यांच्या आक्षेपानुसार गट नं २४९ व ६८८ चे संपुर्ण क्षेत्र व खातेदाराचे नांव आपसात बदल करण्याच्या प्रकरणामुळे श्री नरसिंग चंदर यांचे संमती रु १००/- च्या बंधपत्राआधारे श्री रामजी लालू इस्नेकर यांना दिनांक २७.०३.२०२३ रोजी शेतीचा मावेजा रु.९,४७,८९६/- देण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगव्हाण व येळपणे (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील शिवारात एकाच दिवशी दोन बिबट्यांचा झालेला मृत्यू**

**(१५) ५२३८८ (२४-०१-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगव्हाण व येळपणे (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील शिवारात एकाच दिवशी दोन बिबट्यांचा मृत्यू झाल्याचे दिनांक २४ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागाने या बिबट्यांचा मृत्यू कोणत्या कारणाने झाला याची चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०५-२०२३) :** (१) व (२) दिनांक २१.०९.२०२२ रोजी रायगव्हाण येथील ग्रामस्थानी दिलेल्या माहीतीनुसार वनपरिक्षेत्र अधिकारी, श्रीगोंदा वनरक्षक / वनपाल हे रायगव्हाण येथे गेले असता एक बिबट हा अतिशय क्षीण अवस्थेत आढळून आला. सदर बिबट मादीचा पशुवैद्यकीय अधिकारी (गट-अ) श्रेणी-१ बेलवंडी ता. श्रीगोंदा यांचेकडे औषधोपचार सुरु असताना दिनांक २२.०९.२०२२ रोजी सदर बिबट्याचा मृत्यु झाला आहे.

सदर बिबट्याचा मृत्यु Pneumonia मुळे झाल्याचे शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे.

दिनांक २२.०९.२०२२ रोजी मौजे येळपणे (धावडेवाडी) येथे एक बिबट मृत आवस्थेत आढळून आला आहे. सदर बिबट्याचा मृत्यु हा Internal Hemorrhage caused by injury in Thoracic Cavity मुळे झाल्याचे पशुवैद्यकीय अधिकारी (गट-अ) श्रेणी-१ बेलवंडी ता. श्रीगोंदा यांचे शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाडा (जि.पाजघर) प्रांताधिकारी यांच्या भ्रष्ट व मनमानी कारभाराबाबत**

**(१६) ५२९१३ (२९-०१-२०२३). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा (जि.पालघर) विभागातील उपविभागीय अधिकारी श्री. आगे पाटील यांनी पदभार सांभाळल्यापासून गोरगरीब शेतकऱ्याची कामे करण्यासाठी पैसे घेवून गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्यस्थितीत भूसंपादनाचे अनेक प्रकल्प प्रलंबित ठेवून त्यांनी नेमलेल्या दलालास हाती धरून मोठ्या प्रमाणात पैसे घेतल्याशिवाय काम करत नसल्याने सामान्य गोरगरीब शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यासंदर्भात त्यांच्या वापरातील तीन मोबाईलचे सीडीआर काढून चौकशी करावी तसेच त्यांनी नेमलेल्या दलालाची चौकशी करणे आवश्यक आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०६-०६-२०२३) :**(१) हे खरे नाही, असा अहवाल जिल्हाधिकारी, पालघर यांचे कार्यालयाने शासनास सादर केला आहे.
(२), (३) व (४) पालघर जिल्ह्यातील वाडा उपविभागांतर्गत वाडा व विक्रमगड तालुक्यांचा समावेश होत असुन, वाडा उपविभागांतर्गत विविध ४ प्रकल्पांसाठी जमीन संपादनाची कार्यवाही सुरु आहे. या प्रकल्पांतर्गत वाडा उपविभागामध्ये निवाडा पारित होऊन भूसंपादन मोबदला अदा करावयाच्या टप्प्यावर कोणत्याही प्रकल्पाचे काम प्रलंबित नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रांगणा व भूरकी (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील शेत परिसरामध्ये वाघाच्या हल्ल्यात एका इसमाचा झालेला मृत्यु**

**(१७) ५४६४८ (२४-०१-२०२३). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उकणी, पिंपळगांव, बोरगांव, जुनाड, कोलार पिपरी, गोवारी, मुंगोली, भालर, रांगणा, भूरकी, शिरपुर, निलजई, सुंदरनगर, तरोडा, लाठी, बेसा, आदी (ता.वणी, जि.यवतमाळ) परिसरामध्ये वाघ दिसण्याच्या मोठ्या घटना समोर येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा घटना होत असतानाच रांगना-भूरकी शेत परिसरामध्ये वाघाच्या हल्ल्यात अभय मोहन देउळकर यांचा मृत्यु झाल्याचे दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार मृत्यू झालेल्या इसमाच्या कुटूंबाला आर्थिक मदत देण्याबाबत तसेच संबंधीत वनविभाग कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०५-२०२३) :** (१) यवतमाळ वनवृत्तातील पांढरकवडा वनविभागाअंतर्गत असलेल्या वनपरिक्षेत्र वणी येथील वेस्टर्न कोल्डफील्ड लि. च्या क्षेत्रात मौजा उकणी, पिपळगांव, जुनाड, बोरगांव, कोलारा पिंपरी,

गोवारी, मुंगोली, भाल्लर, रांगणा भूरकी, शिरपूर, निलजई, सुंदरनगर, तरोडा, लाठी, बेसा, आदि परिसरामध्ये वाघाचा नियमीत वावर असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) व (३) दिनांक १०.११.२०२२ रोजी श्री. अभय मोहन देऊळकर यांचा वणी-चंद्रपुर सिमेजवळील मौजा भुरकी येथे वाघाच्या हल्ल्यात मृत्यु झाल्याची घटना निदर्शनास आली आहे. प्रसतुत प्रकरणी संबंधित मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसास प्रचलित नियमातील तरतुदीनुसार रु. २०.०० लक्ष अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बनकारंजा, (ता. केज, जि. बीड) या गावची जमीन संपादित करून स्मशानभूमीसाठी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(१८) ५४८७१ (२९-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बनकारंजा, (ता. केज, जि. बीड) या गावचे सन १९८० या कालावधीसाठी तलावामुळे पुनर्वसन झाले आहे. परंतु चार हजार लोकसंख्या असलेल्या सदर गावात अद्याप सार्वजनिक स्मशानभूमी नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्षात बनकारंजा,गावाचे पुनर्वसन झाल्याने गावाशेजारी शासकीय गायरान जमीन नसल्याने स्मशानभूमी साठी जागा उपलब्ध होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, शेतजमीन असणारे लोक अंत्यविधी शेतात करतात परंतु भूमिहीन गरीब लोकांसमोर अंत्यविधी कोठे करायचा हा गंभीर प्रश्न निर्माण होतो त्यामुळे सदर ठिकाणी गावाशेजारील शेतकऱ्याची जमीन शासनामार्फत संपादित करून सदर ठिकाणच्या स्मशानभूमीचा प्रश्न सोडवण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे महसूल मंत्री व जिल्हाधिकारी, बीड. यांच्याकडे दिनांक १९ नोव्हेबंर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली, हे ही खरे आहे काय,
(४)असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०५-०६-२०२३) :** (१) व (२) सदर गावचे पुनर्वसन झालेले आहे. परंतु, बनकरंजा ता.केज, जि. बीड या गावामध्ये अद्याप सार्वजनिक स्मशानभुमी नाही हे खरे नाही. सदर पुनर्वसन झालेल्या गावासाठी संपादित केलेल्या ग.नं. १११७ मधील ०.०८ आर जमीन दि.१६०६.२०१५ रोजी स्मशानभुमीसाठी मंजुर करण्यात आली आहे.
(३) अशा आशयाचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दि.१९.११.२०२२ रोजी निवेदन प्राप्त झाले आहे.
सदर गावाचे पुनर्वसन सन १९९५ साली झालेले असून सदर गावासाठी संपादित केलेल्या ग.नं. १११७ मधील ०.२० आर पैकी ०.०८ आर जमीन सार्वजनिक स्मशानभुमीसाठी उपविभागीय अधिकारी, आंबेजोगाई यांनी दि.१६.०६.२०१५ रोजी मंजुर केलेली आहे. परंतु, जमीन मालक यांनी मा. दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर अंबाजोगाई यांचेकडे दा.क्र.२१०/२०१५ अन्वये दावा दाखल असुन त्यामध्ये मा. न्यायालयाकडून "जैसे थे" आदेश पारित झालेला आहे. सदरील प्रकरण हे न्यायप्रविष्ठ आहे. सदर प्रकरणी दावा सत्वर निकाली काढण्याकरीता जिल्हा न्यायालयातील सरकारी वकीलांमार्फत पाठपुरावा करावा, असे जिल्हाधिकारी, बीड यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धर्माबाद (जि. नांदेड) तालुक्यातील डावी लघु वितरिकाच्या कामासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला मिळाला नसल्याबाबत

**(१९) ५५६६९ (२९-०१-२०२३). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्माबाद (जि. नांदेड) तालुक्यातील इसापूर उजव्या कालव्याच्या येताळा शाखा कालव्यावरील डावी लघु वितरिका क्र.५ च्या कामासाठी येथील शेतकरी शेख शकील शेख अहमद यांची गट नं.४९७ मधील २.१५ पैकी ०.२१ आर जमीन संपादित करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मावेजा विषयी सातत्याने पाठपुरावा करूनही शेतक-यास मोबदला देण्यात आला नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी तथा भूसंपदान अधिकारी, नांदेड तसेच उपविभागीय अधिकारी, धर्माबाद यांना निवेदन देऊन मोबदला मिळावा अन्यथा आत्मदहन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०५-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) जिल्हाधिकरी तथा भूसंपादन अधिकारी, नांदेड तसेच उपविभागीय अधिकारी, धर्माबाद यांना संपादित जमिनीचा मोबदला मिळावा अन्यथा आत्मदहन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

सदर प्रकरणात जिल्हाधिकारी, नांदेड कार्यालयाकडून दि. ०४/०३/२०२२ रोजी निवाडा पारीत झाला असून विवरणपत्र ई क्र.९० वर शकील शेख अहमद गट क्र. ४९७ संपादित क्षेत्र ०.२१ आर संपादित झाले आहे. प्रकरणात संबंधितास मावेजा वाटपाची दि.१८.०३.२०२२ अन्वये नोटीस देऊन दि. २६.०३.२०२१ रोजी मावेजा घेऊन जाणेबाबत कळविण्यात आले होते.

परंतु रामकृष्ण पि. नारायण रेड्डी रा.येताळा ता. धर्माबाद यांनी जिल्हाधिकारी, नांदेड कार्यालयास दि. २५.०२.२०२१ (प्राप्तदिनांक ०२.०३.२०२१ ) रोजी गट नं ४९७ बाबत आक्षेप अर्ज जिल्हाधिकारी, नांदेड कार्यालयाकडे सादर केला आहे.

सदर प्रकरणात दि. २३.०१.२०२३ रोजी सुनावणी घेण्यात आली. तथापी, सदर प्रकरणात मावेजा वाटपाचा वाद मिटत नसल्यामुळे प्रकरण निर्णयासाठी राखुन ठेवण्यात आले. त्यानंतर भूसंपादन अधिनियम २०१३ मधील कलम ७६ खाली रक्कम प्रकरण प्राधिकरणाकडे पाठविण्याचा आदेश दि.२५.०१.२०२३ रोजी करण्यात आला. सदर प्रकरण हे पिठासीन अधिकारी, महाराष्ट्र भूमिसंपादन व पुनर्वसन प्राधिकरण, औरंगाबाद यांचेकडे भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील कलम ७६ खाली प्रकरण न्याय निर्णयासाठी दि.२५.०१.२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिमूर (जि.चंद्रपूर) येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाचे प्रशासकीय कामकाज सुरु होण्याबाबत

**(२०) ५५७८४ (२९-०१-२०२३). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिमूर (जि.चंद्रपूर) येथे शासन आदेश क्र.प्राफेब-२०१७/व्हीआयपी १४८/प्र.क्र.८७/म-१०, दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय निर्मिती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंजुर अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय चिमूर येथे दिनांक १३ सप्टेंबर २०१९ रोजी वा त्यासुमारास सुधारणा आदेश काढण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, सदर या तालुक्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय चिमूर सद्यस्थितीत चंद्रपूर येथूनच कार्यभार देवून प्रशासकीय काम केली जात असल्याने कर्मचारी व अधिकारी नियुक्ती करण्याच्या प्रक्रियेबाबत उपाययोजना सुरु आहे, हे ही खरे आहे काय ,
(४) असल्यास, उक्त ठिकाणी मंजूर झालेले अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय चिमूर येथेच त्वरीत सुरु करण्याची आवशकता असतांना नियुक्ती आदेशावर अंमलबजावणी झाली नसतांना दिनांक ०२ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासूमारास अपर जिल्हाधिकारी संवर्ग अधिकारी बदली आदेशाद्वारे अधिकारी नेमणूकीनंतरही नियुक्ती प्रलंबित असून प्रशासनात संभ्रम निर्माण झाले असल्याचे निदर्शनास येते, हे हि खरे आहे काय ,
(५) असल्यास , मंजूर झालेले अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय चिमूर येथेच सुरु करण्या बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०६-२०२३) :**(१) होय.
(२) शासन निर्णय दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ मधील तक्त्यातील कार्यालयाचे नाव या रकान्यातील अनुक्रमांक २ मध्ये अपर जिल्हाधिकारी कार्यालय मध्ये अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय "चंद्रपूर" ऐवजी अपर जिल्हाधिकारी "चिमूर" असे करण्याबाबत दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजी शासन शुद्धीपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.
(३),(४) व (५)

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम १३ पोटकलम (३) अन्वये प्राप्त अधिकारांनुसार, जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्ती अपर जिल्हाधिकारी, चिमूर यांना त्यांना नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रापुरत्या प्रदान करण्याबाबत स्वतंत्रपणे अधिसूचना निर्गमित न झाल्यामुळे अपर जिल्हाधिकारी चिमूर कार्यालयाअंतर्गत प्राप्त होणारे अपील विषयक व इतर कामकाज जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथून सुरू आहे. दिनांक ११.०९.२०१९ च्या शासन निर्णयानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय कार्यान्वयीत करण्यास तसेच सदर कार्यालयातील अपर जिल्हाधिकारी (ग्रेड वेतन रु.७६००/- च्या वरील वेतनश्रेणीतील पद असल्याने) या पदास मान्यता घेण्यासाठी मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

महसूल व वन विभागाच्या दिनांक ०२.०८.२०२२ च्या शासन आदेशान्वये श्री. दिपक क्षीरसागर यांची अपर जिल्हाधिकारी, चिमूर या पदावर बदली करण्यात आलेली असून ते अद्यापपावेतो सदर पदावर रुजू झाले नाहीत. श्री. दिपक क्षीरसागर, अपर जिल्हाधिकारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ अन्वये ज्ञापन बजावण्यात आले आहे. तसेच शासन आदेश, महसूल व वन विभाग, दिनांक २७.०७.२०२२ अन्वये श्री. डी.एम. पोरच्चेट्टीवार यांची नायब तहसिलदार, अपर जिल्हाधिकारी कार्यालय, चिमूर येथे नियुक्ती करण्यात आली असून ते दि. १.०८.२०२२ ला सदर पदावर रुजू झाले आहेत. त्यांचे वेतन व भत्ते आहरित करण्याकरिता अपर जिल्हाधिकारी, चिमुर या पदाचा अतिरिक्त कार्यभार उपविभागीय अधिकारी, चिमूर यांचेकडे जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या दि. ३०.०९.२०२२ च्या आदेशान्वये सोपविण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाहूर, (ता. कुर्ला,जि. मुंबई) येथील मतीबाई शंकर यांचे कुळ दाखल असुन सॉल्ट डिपार्टमेंटनी बेकायदेशीर नाव चढविल्याबाबत

**(२१) ५५९३६ (२९-०१-२०२३). श्री.कैलास गोरंट्याल (जालना) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाहूर, (ता. कुर्ला, जि. मुंबई) येथील १५/४ या जमिन मिळकतीमध्ये सन १९४० या कालावधीपासून मतीबाई शंकर यांचे कुळ दाखल असुन १९६२ या कालावधीपासून सॉल्ट डिपार्टमेंटनी बेकायदेशीर नाव चढवून महसुल विभागाच्या अध्यादेशानुसार नाहुर गावाच्या जमिन मिळकती या बिनशेती व औद्योगीक प्रयोजनाकरीता बाधित ठेवल्याने कुळकायदा लागु न करण्याचे आदेश झाले होते,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९६२ या कालावधीपासून या ठिकाणी कुठल्याही प्रकारचे बिनशेती व औद्योगीक प्रयोजन न झाल्याने मुंबई कुळवहिवाट अधिनियम १९५८ नुसार शेतकऱ्यांना जमिन परत देण्याचे अध्यादेशात नियोजन असून सदर जमिन मिळकतीत नऊ दशकांपासून भूमिहीन विधवा महिलेचे कुळ दाखल असल्यामुळे या कुळाचे वारस लावण्या कामी दिनांक १५ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास विभागीय आयुक्त कोकण विभाग, मुंबई व प्रधान सचिव, महसुल यांना अरुण रामा पाटील यांनी वेळोवेळी अर्ज दाखल करुनही जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे यांच्याकडून कुठलीही कारवाई होत नसल्याने त्याबाबत शासनाने दुर्बल व इतर मागासवर्गीय शेतकऱ्यांचे वारस लावण्या कामी शासन स्तरावर निवेदन सादर केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त जमिन मिळकतीचे औद्योगिक व बिनशेती प्रयोजन न झाल्याने शेतकऱ्यांची जमिन त्यांना परत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०६-२०२३) :** (१) मौजे नाहूर येथील स.नं.१५/४, क्षेत्र १ एकर, १०.५ गुंठे ही मिळकत सन १९३९ पासून सॉल्ट डिपार्टमेंट यांच्या नावे दाखल असून सन १९५० मध्ये मथीबाई शंकर यांचे ७/१२ च्या इतर हक्क सदरी संरक्षित कुळ म्हणून नाव दाखल आहे.
(२) दि.१५/०७/२०२२ वा त्या दरम्यान कुळाचे वारसांची नोंद घेण्यासाठी निवेदने प्राप्त झाली आहेत. तथापि, मौजे नाहूर या गावात अधिसूचना क्रमांक TNC-५१५७/ ३१९०-M, दिनांक २९ मार्च, १९५७ व बॉम्बे गर्व्हमेंट गॅझेट, दिनांक ०४ एप्रिल, १९५७ अन्वये बिनशेती व इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंटसाठी राखून ठेवली असल्यामुळे नाहूर गावास कुळकायदा लागू नाही. त्यामुळे कुळाचे वारस दाखल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) सदरची मिळकत ही केंद्र शासनाची असल्याने शेतकऱ्यांना परत देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबाजोगाई (जि. बीड) येथे निजामकालीन जेलच्या जागेवर खाजगी लोक अतिक्रमण करत असल्याबाबत**

**(२२) ५६१६० (२९-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई, (जि. बीड) येथे निजामकालीन जेल असून सदरील इमारत महसूल विभागाच्या अधिकारात असून उक्त इमारत नादुरुस्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शासकीय जागेवर खाजगी लोक अतिक्रमण करत असून दोन तीन दिवसासाठी येथील कैद्यांना बीड येथे घेऊन जावे लागत आहे. त्यामुळे उक्त जेल इमारतीचा प्रस्ताव करून मान्यता द्यावी व निधी उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक २१ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास उपजिल्हाधिकारी व तहसीलदार, अंबाजोगाई. यांचेकडे केली होती हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०२-०६-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणात रे.दि.दा.नं. १३६/२०१५ अन्वये मा. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालय, अंबाजोगाई जि.बीड येथे दावा दाखल झालेला असल्याने मा. न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांचे स्तरावर अतिक्रमण निष्काषीत करण्यासाठी कार्यवाही करणेबाबत तहसिलदार, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी, पोलिस प्रशासन अंबाजोगाई यांना जिल्हाधिकारी यांच्याकडून आदेशीत करण्यात आले आहे.

अंबाजोगाई, (जि.बीड) येथे नवीन जिल्हा कारागृह बांधण्यासाठी अंदाजपत्रके व नकाशासहीत परिपुर्ण प्रस्ताव शासनास अद्यापही अप्राप्त आहेत. क्षेत्रिय कार्यालयाकडून अदयावत दरसूचीवर आधारीत परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त होताच कामाची निकड व निधीची उपलब्धता विचारात घेऊन प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हयाचे विभाजन करुन नवीन खामगांव जिल्हयाची निर्मीती करण्याबाबत

**(२३) ५७२०५ (२१-०४-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव, शेगांव, संग्रामपूर, जळगांव जामोद, नांदुरा व मलकापूर या तालुक्यांच्या विकासाच्या दृष्टीने व नागरीकांच्या सोयीच्या दृष्टीने खामगांव जिल्हा करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बुलढाणा जिल्हयाचे विभाजन करुन नवीन खामगांव जिल्हयाची निर्मीती करण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त अमरावती यांच्यामार्फत माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त जिल्हयाचे विभाजन करुन नवीन खामगांव जिल्हयाची निर्मिती करण्यात येणार आहे काय,याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०६-२०२३) :**(१) होय.
(२) होय.
(३) राज्यातील अस्तित्वात असलेल्या जिल्ह्यांचे विभाजन/पुनर्रचना करण्यासाठी राज्यस्तरावर कोणते निकष विचारात घ्यावे, याबाबत अभ्यास करुन शासनास निकषांबाबत शिफारशी करण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने जिल्हा विभाजन/निर्मिती संदर्भात अहवाल शासनास सादर केला आहे.
नवीन जिल्हा निर्मिती ही एक मोठी आर्थिक व प्रशासकीय प्रक्रिया असून खर्चिक बाब आहे. त्याअनुषंगाने विविध पैलू तपासून त्यासंदर्भात मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन जिल्हा निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाच्या प्रस्तावाबाबत

**(२४) ५७६५४ (२१-०४-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे कार्यावाहीस्तव विचारात घेण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने उक्त जिल्ह्याचे विभाजन करून कोणकोणत्या जिल्ह्याचा समावेश करण्यात येणार आहे, तसेच विभाजनाबाबत आत्तापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०६-०६-२०२३) :**(१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि. ठाणे) तालुक्यातील मुंबई वडोदरा महामार्गाच्या भूसंपादनाच्या देण्यात येणाऱ्या मोबदल्यात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२५) ५७६५७ (२१-०४-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि. ठाणे) तालुक्यातुन जाणाऱ्या मुंबई वडोदरा महामार्गाच्या भूसंपादनामध्ये बाधित होणाऱ्या सर्व्हे नं.१२०/३व ५ मधील सन २०११ मध्ये मृत्यू झालेल्या ठकी सवर यांच्या जागी दुसऱ्या बनावट महिलेस उभी करून मयत आदिवासी महिलेच्या नावे लाखो रुपये काढून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,त्यानुषंगाने शासनाची फसवणूक करणाऱ्या संबंधितावंर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०५-०६-२०२३) :** (१) व (२) मौजे दुगाड, ता. भिवंडी येथील जमिनींचा निवाडा दिनांक ०२/०५/२०१८ रोजी मंजुर झालेला आहे. सर्व्हे नंबर गोळा असल्याने फेरमोजणी केली असता श्रीमती ठकी संख्या सवर यांचे नांवे स.नं. १२० / अ प्लॉट नं. ३ व ५ क्षेत्र ०-१५० हे. आर. व स.नं. १२०/३/अ क्षेत्र ०-१५० हे. आर आहे. संपादन झालेल्या जागेचा मोबदला रक्कम रूपये ५८,४२,९९६/- ठकी सख्या सवर यांचे नावाचे बनावट कागदपत्र सादर करून ठकी सख्या सवर म्हणून भागीरथी रामा मुकणे यांनी बँक खात्यावर स्विकारलेला आहे. तथापी, श्रीमती भागीरथी रामा मुकणे यांनी बनावटपणे शासनाची दिशाभूल व फसवणूक करून मोबदला स्विकारलेला आहे, अशी खात्री झाल्याने त्यांचे कडून मोबदल्याची एकुण रक्कम रूपये ५८,४२,९९६/- दिनांक ०९/११/२०२२ रोजी वसूल केली आहे.. सदरच्या प्रकरणी बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय यंत्रणेची फसवणूक करून शासकीय रक्कम बनावट कागदपत्र दाखल करुन स्विकारली होती म्हणून श्रीमती भागीरथी रामा मुकणे व इतर संशयीत यांचे विरूध्द प्रथम खबर क्रमांक (F.I.R.) ०६९७/२०२२ दिनांक १६/११/२०२२ नोंदविण्यात आलेला आहे.

३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात एसटी कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑप बँकेतील निम्म्याहून अधिक पदे रिक्त असल्याबाबत**

**(२६) ५७८७९ (२२-०४-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एसटी कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑप बँकेतील निम्म्याहून अधिक पदे गेल्या आठ-दहा वर्षापासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पदभरती कोणाकडून करायची यावर व्यवस्थापन आणि संचालक मंडळ यांच्यात वाद सुरु असल्यामुळे पदभरती प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात एसटी कर्मचाऱ्यांच्या बँकेतील रिक्त पदामुळे बँकेच्या कामकाजावर व गुणवत्तेवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर बँकेतील प्रलंबित पदभरती पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०२-०६-२०२३) :** (१) होय.
बँकेच्या मंजूर संरचनेनुसार एकूण ६४८ पदे मंजूर आहेत. त्यापैकी दिनांक ३१/०३/२०२३ अखेर एकुण सर्व प्रवर्गातील ३४९ पदे रिक्त आहेत.
(२) होय.
(३) व (४) कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे ग्राहक सेवेवर विपरीत परिणाम होऊ नये म्हणून संचालक मंडळाच्या मान्यतेने ५६ निवृत्त कर्मचाऱ्यांना तात्पुरत्या कालावधीसाठी विविध शाखांमध्ये नियुक्त करण्यात आले असून त्यांच्या मार्फत संस्थेचे कामकाज चालविण्यात येत आहे.
नोकर भरतीसाठी एजन्सी नियुक्तीवरून प्रशासन आणि संचालक मंडळामध्ये वादनिर्माण झाला होता. दरम्यान बँकेच्या संचालक मंडळाची मुदत दि.३०.०५.२०२० रोजी संपुष्टात आली आहे. संचालक मंडळाची निवडणुक प्रक्रिया सुरू झाली असल्याने सद्यस्थितीत बँकेतील नोकरभरती प्रक्रीया राबविण्यात येऊ नये असे निर्देश सहकार आयुक्तांनी दि.१२.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये बँकेस दिले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## कृषी सेवकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(२७) ५८०६५ (१९-०४-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अजित पवार (बारामती), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृषि विभागातील क्षेत्रिय कृषी सहाय्यकांची पदे कृषि सेवक म्हणून दरमहा रु.२५००/- इतक्या निश्चित वेतनावर दिनांक ६ फेब्रुवारी, २००४ च्या शासन निर्णयान्वये भरण्यात आली होती व दिनांक १९ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयान्वये कृषि सेवकांचे मानधन वाढवून रु.६००० इतके करण्यात आले, हे खरे आहे काय
(२) असल्यास, याप्रकरणी मुंबई उच्च न्यायाल्याच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक ३० जून, २०२२ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये कृषी सेवकांना ७ व्या वेतन आयोगानुसार किमान वेतन १५००० ते २०००० अदा करण्यात यावे असा निर्णय दिला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील न्यायलयीन निर्णयाच्या अनुषंगाने मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मंत्रालयात झालेल्या बैठकीत कृषी सेवकांना ७ व्या वेतन आयोगानुसार किमान वेतन १५००० ते २०००० अदा करण्यासाठी प्रस्ताव मंत्री मंडळाकडे पाठवण्याचे निर्देश देण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अद्यापही कृषि सेवकांना प्रतिमाह रु.६०००/ इतक्या तुटपुंज्या मानधनावर काम करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत कृषी सेवकांना ७ व्या वेतन आयोगानुसार वेतन देण्यासंदर्भात शासनाची भूमिका काय आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०१-०६-२०२३) :**(१) होय हे खरे आहे.
वेतनावरील खर्च नियंत्रित करण्याच्या शासनाच्या धोरणाच्या अनुषंगाने कृषि विभागातील कृषि सहाय्यकांची पदे सुरुवातीस कृषि सेवक म्हणून रु.२५००/- या निश्चित वेतनावर भरण्याचा धोरणात्मक निर्णय सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने या विभागाच्या दि.०६.०२.२००४ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. तसेच याबाबतचे सविस्तर आदेश व मार्गदर्शक सूचना दि.१७.०२.२००४ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.
तद्नंतर दि.१९.०३.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.०१.०४.२०१२ पासून कृषिसेवकांच्या निश्चित वेतनामध्ये रु.२५००/- वरुन रु.६०००/- एवढी वाढ करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.
कृषि सेवकांच्या मानधनात वाढ करणेबाबत मा.न्यायालयाकडून कोणतेही आदेश या विभागास प्राप्त नाहीत.
(३) व (४) होय, हे अंशत: खरे आहे.
कृषि सेवकांच्या निश्चित वेतनामध्ये वाढ करण्याबाबत मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील दि.२२.०९.२०२२ रोजी आयोजित बैठकीच्या इतिवृत्तानुसार कृषि सेवकांच्या निश्चित वेतनात वाढ करण्यासंदर्भातील आवश्यक प्रस्ताव मान्यतेसाठी मा.मंत्रीमंडळासमोर सादर करावा असे ठरले.
(५) त्यानुसार सद्यस्थितीत कृषि सेवकांच्या निश्चित वेतनात वाढ करण्यासंदर्भातील आवश्यक प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हवेली (जि.पुणे) येथील नागरिकांच्या प्रशासकीय कामांच्या सोईसाठी अप्पर तहसिल कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(२८) ५८३८१ (२१-०४-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हवेली (जि.पुणे) येथील अप्पर तहसिल कार्यालयास तत्वतः मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील महसूल मंडळामधील वाघोली, उरुळी कांचन, थेऊर आणि कळस या चार महसूल मंडळाकरिता स्वतंत्र अधिकारी व कर्मचारी वर्ग नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कार्यालयाला स्वतंत्र अधिकारी व कर्मचारी वर्ग यांची नेमणुक करण्याबाबतचा आकृतीबंध तयार करण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, नागरिकांच्या सेवेसाठी सदर अप्पर तहसिल कार्यालय केव्हा सुरु करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०६-०६-२०२३) :** (१), (२), (३) व (४) अपर तहसील कार्यालय निर्मितीबाबत विभागाच्या प्रचलित पध्दतीनुसार संबंधित विभागीय आयुक्तांकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर विभागाचे मंत्री व मा. मुख्यमंत्री यांची तत्वत: मान्यता घेवून प्रस्तावास वित्त विभागाने गठीत केलेली उपसमिती व त्यांनी केलेल्या शिफारशीनुसार उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्यात येते. सदर मान्यता प्राप्त झाल्यानंतर अपर तहसिल कार्यालयाचे कार्यक्षेत्र व पदनिर्मितीबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात येतो. प्रस्तुत प्रकरणी विभागीय आयुक्त पुणे यांच्याकडून प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने मौजे लोणी काळभोर, ता. हवेली जि. पुणे येथे अपर तहसिलदार कार्यालय स्थापन करणे व त्यासाठी आवश्यक पदे मंजूरीचा प्रस्ताव वित्त विभागामार्फत उपसमिती / उच्चस्तरीय सचिव समितीपुढे सादर करण्यास मा. मुख्यमंत्री महोदयांची मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर प्रस्ताव उपसमिती / उच्चस्तरीय सचिव समितीपुढे ठेवण्यास मान्यता देण्याची विनंती वित्त विभागास करण्यात आली असता, वित्त विभागाने काही मुद्दे उपस्थित केले होते. सदर मुद्द्यांच्या अनुषंगाने विभागामार्फत माहिती उपलब्ध करुन देण्यात आल्यानंतर वित्त विभागाने सदर प्रस्तावास मंजूरी दिली असून सदर प्रस्ताव वित्त विभागामार्फत उपसमिती व उच्चस्तरिय सचिव समितीपुढे सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.
वाघोली, उरूळीकांचन, थेऊर आणि कळस या चार महसूल मंडळाकरिता स्वतंत्र अधिकारी व कर्मचारी वर्ग नाही अशी बाब नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकर (जि.नांदेड) शहरात युरीया खताची कृत्रिम टंचाई निर्माण करुन जास्त दराने शेतकऱ्यांना विक्री केल्याबाबत**

**(२९) ५८७९१ (२०-०४-२०२३). श्री.माधवराव पवार (हदगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकर (जि.नांदेड) शहरात युरीया खताची कृत्रिम टंचाई निर्माण करुन जास्त दराने शेतकऱ्यांना विक्री केली जात

असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (३१-०५-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केज (जि.बीड) येथील पोकरा योजनेत पूर्वी समावेश नसलेल्या गावांचा समावेश करुन योजना सुरु ठेवण्याबाबत**

**(३०) ५८८८७ (२०-०४-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (जि.बीड) येथे शेतीला पाणी उपलब्ध नसल्यामुळे दरवर्षी अनेक गावातील लोक ऊस तोडणीसाठी दुसऱ्या राज्यात जातात तसेच तेथील मोठ्या प्रमाणात शेतकरी अल्प व अत्यल्प भूधारक असून मोलमजूरी करुन उपजिविका भागवतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य निर्माण करणाऱ्या पोकरा योजनेत पूर्वी समावेश नसलेल्या गावांचा समावेश करुन योजना सुरु ठेवण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पूर्वी समावेश नसलेल्या किती गावांचा पोकरा योजनेत समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०५-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाचा कालावधी माहे जून २०२४ पर्यत आहे.
सबब, प्रकल्पाचा उर्वरित कालावधी पाहता नव्याने गावे समाविष्ट करणे सद्यस्थितीत संयुक्तिक ठरणार नाही.
(४) अशी बाब नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील स्मार्ट व गटशेती योजनेच्या मंजूरीमध्ये दिरंगाई होत असल्याबाबत**

**(३१) ५९६८४ (२१-०४-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील स्मार्ट व गटशेती योजनेच्या मंजूरीमध्ये दिरंगाई होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, कृषी यांच्याकडे दिनांक ३० मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्मार्ट व गटशेतीसाठी अर्ज केलेल्या ॲग्रो प्रोड्यासिंग कंपन्या व संस्थेचे प्रस्ताव कृषी विभागाच्या किचकट निविदा व अटींमुळे प्रलंबित राहिल्याने प्रस्ताव अपूर्ण असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत वेळोवेळी जिल्हास्तरावर बैठका घेवूनही अपेक्षीत कार्यवाही कृषि विभागाकडून करण्यात आली नसल्यामुळे शेतकरी कोट्यवधी रुपयांच्या कर्जामुळे आर्थिक संकटात सापडून कर्जबाजारी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्व प्रलंबित प्रस्ताव वेळेत पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०५-०६-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामिण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (पीआययू) कृषि, पशुसंवर्धन, माविम, MSRLM व VSTF या सर्वाचे कोल्हापूर जिल्ह्यासाठी लक्षांक ४० असून आज अखेर ४० संस्थाना प्राथमिक मान्यता दिलेली आहे. त्यापैकी पीआयु कृषि यांना २६ संस्थांचे लक्षांक असून २६ संस्थांना प्राथमिक मान्यता देण्यात आलेली आहे.
तसेच गट शेतीस प्रोत्साहन देण्याकरीता २०१७-१८ व २०१८-१९ मध्ये अनुक्रमे १९६ व २११ अशा एकूण ४०७ शेतकरी गटांची निवड करण्यात आली असून त्यापैकी ३४१ आराखडे मंजूर करण्यात आले. त्यापैकी १३४ गटांना कर्ज मंजूर झाले आहे. या योजनेत पाठपुरावा करुन बँक कर्ज मिळवून देण्यात आलेले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात अवैध सावकारीमुळे आत्महत्यांच्या प्रमाणात वाढ होत असल्याबाबत

**(३२) ५९८५८ (२१-०४-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अवैध सावकारीमुळे आत्महत्यांच्या प्रमाणात वाढ होत असून तसेच अवैध सावकारीच्या व्यवसायात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असून त्यासंदर्भात शासनाकडे तक्रारी प्राप्त होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परवाने घेवून सावकारी करण्याची तरतूद असतानाही परवान्याशिवाय अवैध सावकारी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार अवैध सावकारीविरोधी कारवाई करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०२-०६-२०२३) :** (१) व (२) राज्यात महाराष्ट्र सावकारी (नियमन)अधिनियम,२०१४ सावकारी कायदा अंमलात आल्यापासून जानेवारी २०२३ अखेर अवैध सावकारी बाबत ९३५८ तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यापैकी ९०७ प्रकरणांमध्ये अधिनियमांतील कलम १८(२) अन्वये आदेश पारित करून ४९८.९७ हेक्टर जमीन शेतकऱ्यांना परत करण्यात आली आहे. तसेच एकुण ४९५ प्रकरणात संबंधितांवर गून्हे दाखल झालेले आहेत.
(३) अवैध सावकारीबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने चौकशी करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते. सदर कायदयाची अंमलबजावणी योग्य रितीने होण्यासाठी व अनधिकृत सावकारी करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०१ मार्च, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वे समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीमार्फत अवैध सावकारी विरुध्द करण्यात येत असलेल्या कारवाईचा नियमितपणे आढावा घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे अणिक (ता.कुर्ला) येथील शासकीय जागा बनावट कागदपत्रे तयार करुन खेतान इंडस्ट्रीज लि.च्या नावे करण्यात आल्याबाबत**

**(३३) ५९९२२ (२१-०४-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अणिक, (ता.कुर्ला) येथील गट क्र.१६६ ही शासकीय जागा (मिठागर) बनावट कागदपत्रे तयार करुन खेतान इंडस्ट्रीज लि.चे नावे ७/१२ करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन ती जागा शासनाने ताब्यात घ्यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, मुंबई यांच्याकडे दिनांक २२ नोव्हेबंर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने अभिलेख तपासले असता, मौ.अणिक, ता.कुर्ला येथील सर्व्हे नंबर १६६ ची जमीन खेतान इंडस्ट्रीज लि. मुंबई यांनी खरेदी खताने दिनांक २५/०१/१९५१ रोजी जसकरण लालचंद हनुमान बक्षलाल चंद पुरणमल लालचंद यांच्याकडून रुपये ६० हजारात घेतले असा फेरफार क्रमांक ३२७ नोंदविण्यात आला असून, सदर फेरफार क्रमांक ३२७ दिनांक १९/०५/१९५३ रोजी मंजूर करण्यात आला आहे.

लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे फेरफार क्रमांक ३२७ ही नोंद मंजूर असल्याचे दिसून येते. त्यामुळे खेतान इंडस्ट्रीजचे नाव चुकीने लावले असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही.

सदर निवेदनाच्या अनुषंगाने वस्तुस्थितीदर्शक परिस्थिती जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक ०१/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये लोकप्रतिनिधींना कळविली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात कृषी सहाय्यकाची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३४) ६०१५२ (१९-०४-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी विभागांतर्गत कृषी सहायकांची १७५७ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रिक्त पदांमुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढत असून पदभरती होत नसल्याने बरोजगारांमध्ये असंतोष वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कृषी सहायकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०१-०६-२०२३) :**(१) हे खरे आहे.

कृषि विभागात कृषि सहाय्यकांची ११५९९ मंजूर पदे असून यापैकी माहे मार्च, २०२३ अखेर ९३३९ पदे भरलेली आहेत व २२६० पदे रिक्त आहेत. सरळसेवेच्या कोट्यातील १०४३९ पदांपैकी ८४६४ पदे भरलेली आहेत व १९७५ पदे रिक्त आहेत. कृषि सहाय्यकांच्या एकूण मंजूर पदसंख्येचा विचार करता सद्यस्थितीत रिक्त पदांचे प्रमाण १९ टक्के आहे.

(२), व (३) करीता कृषि सहाय्यकांच्या रिक्त पदांचा अतिरीक्त पदभार नजिकच्या कृषि सहाय्यक यांचेकडे देवून कृषि विभागाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात येत असून शेतकऱ्यांना सेवा मिळण्यास कोणतीही अडचण निर्माण होणार नाही, याची सर्वतोपरी काळजी घेण्यात येत आहे.

कोविड-१९ महामारीच्या पार्श्वभूमीवर अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्तीय उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने वित्त विभाग, शा.नि.दि.०४.०५.२०२० अन्वये पदभरतीवर निर्बंध लावण्यात आलेले होते. सदर निर्बंध वित्त विभागाच्या दि.३१.१०.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये शिथिल करण्यात आले असून ज्या विभागांचा सुधारीत आकृतिबंध अंतिम झालेला नाही अशा विभागांना गट-अ, गट-ब व गट-क मधील (वाहनचालक व गट-ड संवर्गातील पदे वगळून) सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या ८० टक्के मर्यादेपर्यंत पदे भरण्यास मुभा देण्यात आलेली आहे. कृषि विभागाचा सुधारीत आकृतिबंध अंतिम झालेला नसल्यामुळे कृषि सहाय्यक संवर्गाची रिक्त पदांच्या ८० टक्के मर्यादेत पदे भरण्याकरिता आवश्यक नियमोचित कार्यवाही विभागामार्फत प्राथम्यक्रमाने चालू आहे.

दरम्यान, सा.प्र.वि., शासन निर्णय दि.०१.०२.२०२३ अन्वये अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) पदे निश्चित करण्याचे निकष बदलण्यात आलेले आहेत. त्यानुसार कृषि सहाय्यक संवर्गाची सुधारीत बिंदूनामावली प्रमाणित करुन घ्यावयाची कार्यवाही संबंधित विभागीय कृषि सहसंचालक यांचेस्तरावर सुरु आहे. सुधारीत बिंदूनामावली प्रमाणित झाल्यानंतर कृषि सहाय्यक पदभरतीची पुढील नियमोचित कार्यवाही प्राथम्यक्रमाने करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बार्टीच्या धर्तीवर महाज्योती संस्थेचे जिल्हावार प्रशिक्षण केंद्र नसल्यामुळे इतर मागास प्रवर्गातील शेकडो विद्यार्थी परीक्षा प्रशिक्षणापासून वंचित असल्याबाबत

**(३५) ६०३०३ (१९-०४-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बार्टीच्या धर्तीवर स्थापन झालेल्या महाज्योती संस्थेचे जिल्हावार प्रशिक्षण केंद्रच अद्याप सुरु झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्हावार केंद्र नसल्यामुळे राज्यभरातील इतर मागास प्रवर्गाचे शेकडो विद्यार्थी परीक्षा प्रशिक्षणापासून वंचित राहत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाज्योती संस्थेला स्थापन करुन अडीच वर्षाचा कालावधी होवूनही पोलीस भरती, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोग, जेईई, नीटचे प्रशिक्षण केंद्र जिल्हावार स्थापन करण्यासाठी इतर मागास प्रवर्ग महासंघाने दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास महाज्योतीच्या कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासन इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग या कमकुवत घटकांच्या सर्वसमावेश व शाश्वत विकासाकरिता जिल्हावार प्रशिक्षण केंद्रे सुरु करण्यात येणार आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (३०-०५-२०२३) :** (१) होय.
(२) नाही.
(३) व (४)
तथापि, जिल्हावार प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबत महाज्योतीच्या संचालक मंडळाने अदयाप कोणताही ठराव संमत केलेला नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथे महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) चे भवन निर्माण करण्याबाबत**

**(३६) ६०३१२ (२१-०४-२०२३). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) चे भवन निर्माण करण्यासाठी रुपये २७ कोटी ७२ लक्ष १८ हजार भरुन दोन एकर जागा ताब्यात घेण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जागेवर महाज्योतीचे अद्ययावत कार्यालयासह स्टुडीओ, विविध ऑडीटोरीयम, सुसज्ज डीजीटल ग्रंथालय बांधकाम इत्यादीबाबतचा रुपये १२० कोटीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात प्रस्तावित कामाला मंजुरी देऊन नागपूर येथे महाज्योती भवन बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (३०-०५-२०२३) :** (१) होय

(२) हे अंशत: खरे आहे.

महाज्योतीने १२ मजली इमारत बांधकामाचा रु. ८०.१८ कोटीचा व ७ मजली इमारत बांधकामाचा रु. ७९.६५ कोटीचा असा एकूण अंदाजे १६०.०० कोटीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

(३) महाज्योती संस्थेने इमारत बांधकामबाबत सादर केलेले नकाशे, अंदाजपत्रके तपासण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिनस्त समितीकडे सादर करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जमीन खरेदी विक्रीच्या दस्त व सातबारा उताऱ्यावर शेत रस्त्याची नोंद करण्याबाबत**

**(३७) ६०४२३ (२१-०४-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतीला दळणवळणासाठी रस्ते नसल्याचे तसेच रस्ते अतिक्रमीत व अडवल्याच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी असल्याने व विज्ञान युगात शेतीच्या मशागत ते कापणी पर्यंतच्या तसेच शेतमालाच्या यंत्राच्या व वाहनांच्या वाहतुकीसाठी अडचणी निर्माण होत असल्याने शेत जमिनीच्या खरेदी विक्री दस्त नोंदणी व नकाशावरील सद्यस्थितीतील असलेल्या रस्त्यांच्या नोंदी सातबारावर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०५-०६-२०२३) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

अशा आशयाचे लोकप्रतिनिधीचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे. तथापि, याबाबतीत, नमूद करण्यात येते की, महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक करणे यासाठी तसेच शेतकरी व सर्वसामान्य जनतेचे दैनंदिन प्रश्न त्वरित निकाली काढण्याच्या अनुषंगाने राज्यात दरवर्षी १ ऑगस्ट ते ३१ जूलै या कालावधीत "महाराजस्व अभियान" राबविले जाते.

सदर महाराजस्व अभियानांतर्गत "गाव नकाशाप्रमाणे अतिक्रमित व बंद झालेले गाडी रस्ते/ पाणंद/पांधण/शेत रस्ते/ शिवाररस्ते/ शेतावर जाण्याचे पायमार्ग मोकळे करणे, पोटखराबा वर्ग-अ खालील जमिन लागवडीखाली आणण्यासाठी

विशेष मोहिम राबविणे, याकरिता कार्यपद्धत विशद करण्यात आली आहे. नकाशावरील सदय स्थितीतील असलेल्या रसत्यांच्या नोंदी सातबारावर घेण्याबाबत कायदा / नियमातील तरतूदी तपासुन निर्णय घेण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्ह्यातील देवणी गोवंशाचे जतन व संवर्धन करण्याबाबत

**(३८) ६०४९० (१९-०४-२०२३). श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यातील देवणी गोवंश शेतीकाम तसेच दुध उत्पादनासाठी प्रसिद्ध असून या गोवंशाला विविध पशुप्रदर्शनामध्ये अनेक पारितोषिके प्राप्त असून देशपातळीवरील पशुप्रदर्शनात १७ वेळा चॅम्पियनशिप मिळाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देशभरातून मागणी असलेल्या या देवणी गोवंशाचे जतन, संवर्धन करण्यासंबंधीचा प्रस्ताव जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन, लातूर यांनी माहे, जुलै २०२१ मध्ये वा त्यादरम्यान शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्ताव जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन, लातूर यांचेकडून लातूर जिल्ह्यामध्ये देवणी गोवंश संवर्धन प्रकल्प राबविण्यासाठी केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत सुधारीत प्रकल्प प्रस्ताव विभागास प्राप्त झाल्यानंतर तो मंजूरीसाठी राष्ट्रीय कृषी विकास योजना कक्ष यांच्याकडे मंजूरीसाठी सादर करण्यात येणार आहे, उक्त मंजुरीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०१-०६-२०२३) :** (१ ) देवणी जातीचे वळू देखणे व शेतीकामास उपयुक्त असल्याने, बऱ्याच पशु प्रदर्शनांमध्ये त्यांना पारितोषिक प्राप्त झालेले आहे.
(२) व (३) जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, लातूर यांनी राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत देवणी गोवंश संवर्धन प्रकल्पाचा सुधारित प्रस्ताव आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांच्या कार्यालयास दि.२.०३.२०२२ रोजी सादर केलेला होता.
केंद्र शासनाच्या कृषी विभागाने राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या प्रकल्पांना सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून निधी उपलब्ध होणार नसल्याचे कळविण्यात आल्यामुळे सदरचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.
सदरचा प्रकल्प पुर्णत: राज्य निधीमधून राबविणे आवश्यक असल्याने तसा सुधारित प्रस्ताव सादर करण्यास आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांनी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, लातूर यांना कळविलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवीन खारेपाटण (जि. सिंधुदूर्ग) तालुका निर्मिती करण्याबाबत

**(३९) ६०५११ (२१-०४-२०२३). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवीन खारेपाटण (जि. सिंधुदूर्ग) तालुका निर्मिती करण्यासाठी खारेपाटण तालुका कृती समिती व अन्य ग्रामपंचायत सरपंच यांनी मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री, मुख्य सचिव, अपर मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य, यांना माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान इमेल द्वारे निवेदन पाठवून खारेपाटण तालुका अथवा तेथे अप्पर तहसीलदार कार्यालय करण्याची मागणी केलीआहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुका होण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांनी सादर केला आहे काय,
(३)तसेच नवीन खारेपाटण येथे तालुका कृती समिती व अन्य ग्रामपंचायत, सरपंच व अप्पर तहसीलदार कार्यालय मंजूर करण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०६-२०२३) :**(१) होय.

सिंधुदुर्ग जिल्हयात खारेपाटण या नविन तालुक्याची निर्मिती करावी याबाबत खारेपाटण तालुका निर्मिती कृती समितीचे निवेदन प्राप्त झालेले आहे.

(२) नाही.

(३) राज्यातील तालुका विभाजन/पुर्नरचना करण्याकरिता निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने आपला अहवाल दि.०६.०३.२०१३ रोजी सादर केला होता. तथापि, महसूल विभागांतर्गत बऱ्याच सेवांचे संगणकीकरण झालेले असल्यामुळे या बदलाच्या पार्श्वभूमीवर समितीने केलेल्या शिफारशी, निकष, गुणांक आजच्या परिस्थितीत लागू पडतीलच, असे म्हणता येणार नाही. सबब महसूल विभागातील विविध सेवांचे झालेले संगणकीकरण, माहिती तंत्रज्ञानात झालेला बदल, या बाबी विचारात घेता, राज्यातील तालुक्यांच्या विभाजनांच्या अनुषंगाने नव्याने निकष ठरविण्यासाठी शासन परिपत्रक क्र. प्राफेब-२०११/प्र.क्र.९६/म१०, दिनांक०२.०३.२०२३ अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे. नवीन तालुका निर्मिती ही एक मोठी आर्थिक व प्रशासकीय प्रक्रिया असून खर्चिक बाब आहे. त्याअनुषंगाने विविध पैलू तपासून त्यासंदर्भात मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

राज्यातील सर्व विभागीय आयुक्तांना त्यांच्या विभागाच्या नियंत्रणाखालील महानगरपालिका क्षेत्रामध्ये वाढलेली लोकसंख्या, तालुक्यातील दुरच्या भागातील जनतेस तातडीने व नजिकच्या ठिकाणी सेवा उपलब्ध व्हाव्यात तसेच सद्याच्या तहसिल कार्यालयातील कामकाजाचा वाढता व्याप या सर्व बाबींचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार स्वतंत्र अप्पर तहसिल कार्यालय निर्माण करण्याबाबत आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत सखोल तपासणी करुन स्वयंस्पष्ट व परीपूर्ण प्रस्ताव सादर करणेबाबत शासनाच्या दिनांक १९.१२.२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदरचे प्रस्ताव प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रावेर (जि.जळगाव) तालुक्यातील रासायनिक खत विक्रेते खतांची कृत्रिम टंचाई निर्माण करत असल्याबाबत**

**(४०) ६०६२० (१९-०४-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (जि.जळगाव) तालुक्यातील रासायनिक खत विक्रेते शेतकऱ्यांना खत देत नसून कृत्रिम टंचाई निर्माण करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच खत विक्रेते लिंकिंग खत घेण्यासाठी सक्ती करुन शेतकऱ्यांची फसवणूक करीत असल्याचेही माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन कृत्रिम खत टंचाई थांबवून शेतकऱ्यांची लूट रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (३१-०५-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२) रावेर तालुक्यात सदर प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) जळगाव जिल्हयात दररोज कृषक अॅपवर जिल्हयातील रासायनिक खतांचा ग्रेडनिहाय उपलब्ध साठा अपडेट केला जातो व या अॅपद्वारे शेतकऱ्यांना एका क्लिकद्वारे विक्रेत्याकडील उपलब्ध साठा कळतो. खत विक्रेते यांना भावफलक व उपलब्ध रासायनिक खतांचा साठा दर्शनीय भागात प्रदर्शित करणे अनिवार्य करण्यात आले आहे. जिल्हयात १६ भरारी पथकांची निर्मिती करण्यात आलेली आहे. गुणवत्ता निरीक्षकांद्वारे रासायनिक खते विक्री केंद्राच्या करण्यात आलेल्या

तपासणीत खतांचे २ परवाने रद्द व ३७ परवाने निलंबित करण्यात आलेले आहेत. जिल्हयात रासायनिक खतांची टंचाई नसून दि. ३१.०३.२०२३ रोजी १०१९१३ मे. टन खत साठा उपलब्ध आहे. खत टंचाई व लिंकिंग संदर्भात लेखी स्वरुपात कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्ह्यातील ९४ शेतकऱ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेंतर्गत लाभ मिळण्याबाबत**

**(४१) ६०९३४ (२१-०४-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील ९४ शेतकऱ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेंतर्गत कामे देऊनही दोन वर्षांपासून अनुदान न मिळाल्यामुळे जिल्हा परिषद कृषी विभागाकडे अनुदानासाठी मागणी करुनही अनुदान प्राप्त न झाल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच निधी मिळत नसल्यामुळे एका शेतकऱ्याने आत्महत्या करण्याचा इशारा विभागाला दिल्याची माहितीही समोर आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त योजनेंतर्गत शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०१-०६-२०२३) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात योजनेअंतर्गत प्राप्त झालेले अनुदानातुन ९४ लाभार्थ्यांना दि.०६/०१/२०२३ रोजी देय अनुदान अदा करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुरार व्हीलेज (मालाड (पूर्व)) मुंबई येथे सांगली सहकारी बँक खातेदारांच्या ठेवी मिळण्याबाबत**

**(४२) ६१२०३ (१९-०४-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुरार व्हीलेज (मालाड (पूर्व)) मुंबई येथे सांगली सहकारी बँक माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान बंद पडून खातेदारांचे ठेवी अद्यापपर्यंत अदा करण्यात आल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर खातेदारांच्या ठेवी मिळण्यासंदर्भात ठेवीदारांनी दिनांक १ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास नमुन्यातील फॉर्म भरुनही अद्याप ठेवी मिळाल्या नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात विहित नमुन्यातील फॉर्म किती जणांनी भरुन दिले व त्यापैकी किती जणांना ठेवीच्या रक्कमा अदा आल्या, याबाबत शासनाने चौकशी करुन शाखा व्यवस्थापनावर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०२-०६-२०२३) :** (१),(२) व (३) सांगली सहकारी बँक लि, मुंबई या बँकेवर रिझर्व बँकेने दिनांक ०७/०७/२०२२ रोजी आर्थिक निर्बंध लागू केले आहेत.
सद्यस्थीतीत बँकेच्या १५२० ठेवीदारांची रु.२८.४९ कोटी इतकी ठेवीची रक्कम DICGC कडून बँकेस प्राप्त झाली असून त्यापैकी मालाड शाखेतील ६७० ठेवीदारांना रूपये १२.८३ कोटी एवढी रक्कम अदा करण्यात आलेली आहे.
बँकेच्या उर्वरित ३२६१ ठेवीदारांची ठेवी रक्कम रु.३९.०१ कोटी DICGC कडून प्राप्त करून घेण्याची कार्यवाही बँकेच्या स्तरावरून सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात खरेदीदस्ताच्या नोंदीवर घेत असलेल्या हरकतीमुळे नोंदी मंजूर होण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(४३) ६१३४५ (२१-०४-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खरेदीदस्तानंतर गाव दप्तरी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४९ नुसार हक्क संपादन करणाऱ्या व्यक्तीने खरेदीने, वारसाने, विभागणीने व देणगीने तलाठी कार्यालयात माहिती दिल्यानंतर जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १५० नुसार फेरफार नोंदवही व विवादग्रस्त प्रकरणांची नोंदवही ठेवली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हितसबंधीत व्यक्ती व्यतिरिक्त त्रयस्त इसमांमार्फत सबंधित फेरफार नोंदीस विनाकारण आर्थिक लाभापोटी आक्षेप नोंदविला जातो, सदरचा आक्षेप अर्ज तलाठी यांना फेटाळण्याचा अधिकार नसल्याने या कार्यालयामार्फत सदरच्या नोंदीवर हरकत घेऊन मंडल अधिकारी अथवा तहसिलदार यांच्याकडे पुढील सुनावणीसाठी वर्ग करण्यात येतो, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, फेरफार नोंद मंजूर होण्यास बराच कालावधी जातो व खरेदी करणाऱ्या व्यक्तीचा अथवा पक्षकाराचा वेळ जाऊन नुकसान होत असल्याने याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०५-०६-२०२३) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) व (३) या विभागाच्या सन २०१४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० अन्वये, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ याच्या कलम १५० मधील पोट-कलम (२) मध्ये पुढील परंतुक दाखल करण्यात आले आहे :-
" परंतु जेथे साठवणुकीचे यंत्र याचा वापर करून, कलम १४८क अन्वये अधिकार अभिलेख ठेवण्यात आले असतील, तर, तालुक्यातील तहसीलदारास, कलम १५४ अन्वये सूचना मिळाल्यानंतर, लगेचच, तहसीलदार कार्यालयातील तलाठी ती सूचना, फेरफारामध्ये ज्याचा हितसंबंध आहे असे अधिकारांच्या अभिलेखात किंवा फेरफार नोंदवहीवरून त्यास दिसून येईल अशा सर्व व्यक्तींना आणि त्यात ज्या व्यक्तीचा हितसंबंध आहे असे त्यास सकारण वाटत असेल अशा इतर कोणत्याही व्यक्तीला व त्याचबरोबर, गावाच्या संबंधित तलाठयास लघुसंदेश सेवा किंवा इलेक्ट्रॉनिक मेल किंवा विहित करण्यात येईल असे इतर कोणतेही उपकरण, याद्वारे पाठवील, आणि अशी सूचना मिळाल्यानंतर गावाचा तलाठी, तातडीने, फेरफार नोंदवहीत नोंद करील

परंतु असे की, भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ अन्वये दस्तऐवजांची नोंदणी करणाऱ्या अधिकाऱ्यासमोर, ज्या व्यक्तींनी स्वतः दस्तऐवज निष्पादित केले असतील, अशा व्यक्तींना, तहसीलदार कार्यालयातील तलाठयाद्वारे, पहिल्या परंतुकान्वये तरतूद केलेली अशी कोणतीही सूचना पाठविणे आवश्यक असणार नाही.

याप्रमाणे, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ याच्या कलम १५० मधील पोट-कलम (२) मध्ये दाखल करण्यात आलेल्या परंतुकानुसार कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर आदिवासी बहुल जिल्ह्यात नियमांचे उल्लंघन करुन दिवसाढवळ्या वृक्षतोड सुरु असल्याबाबत

**(४४) ६१३७४ (२१-०४-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर या आदिवासी बहुल जिल्ह्यात नियमांचे उल्लंघन करुन वनक्षेतत्रांतर्गत वृक्षतोड सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील उपवनसंरक्षकांनी मागील चार-पाच वर्षात एकाही मालकीतोडीला परवानगी दिली नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) त्याचप्रमाणे खैर या झाडापासून गुटखा व तंबाखूजन्य अंमली पदार्थाची निर्मिती करुन जंगल ठेकेदारांनी चोरट्या पद्धतीने ही झाडे तोडून गैरमार्गाने विक्री केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन अवैध वृक्षतोडीस प्रतिबंध घालण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०६-२०२३) :** (१) पालघर या आदिवासी बहुल जिल्ह्यात जव्हार व डहाणू वनविभाग अंतर्भूत आहे. जानेवारी २०२३ मध्ये पालघर जिल्हयातील जव्हार वनविभागात ७९ आणि डहाणू वनविभागात १२४ अशी एकूण २०३ साग व इतर अवैध वृक्षतोड झाल्याचे आढळून आले आहे.

(२) महाराष्ट्र वृक्ष तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम १९६४ नुसार बिगर आदिवासी खातेदारासंदर्भात तर महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या भोगवटदाराच्या झाडांची विक्री (नियमन) अधिनियम १९६९ च्या तरतुदीनुसार आदिवासी खातेदारासंदर्भात खात्यामार्फत विक्री करुन देणेकामी वृक्षधिकारी तथा वनक्षेत्रपाल यांचेकडे महाराष्ट्र लोकसेवा हमी अध्यादेश २०१५ मधील तरतुदीनुसार ऑनलाईन अर्ज संबधित खातेदार यांचेकडून सादर केले जात असतात. त्यास विधीवत कालावधीत नियमानुसार परवानगी देण्यात येत असते. जव्हार व डहाणू वनविभागात मागील चार वर्षात आदिवासी व बिगर आदिवासी खातेदारांच्या मालकी क्षेत्रात एकूण ३७९ वृक्षतोडीच्या प्रकरणांना परवानगी देण्यात आलेली आहे.

(३) जव्हार व डहाणू वन विभागात खैर या झाडापासून गुटखा व तंबाखुजन्य जंगली पदार्थाची निर्मिती करुन जंगल ठेकेदारांनी चोरटया पध्दतीने ही झाडे तोडून गैरमार्गाने विक्री केल्याची घटना निदर्शनास आली नाही.

(४) जव्हार वनविभागात प्रामुख्याने वाडा उपविभागात भिवंडी वाडा मनोर हा राज्यमार्ग, मुंबई-आग्रा-अहमदाबाद या राष्ट्रीय द्रुतगती महामार्गास जोडलेला आहे तसेच जव्हार-मनोर-वाडा, वाडा-खोडाळा-नाशिक, वाडा-अघई-शहापूर या सारख्या राज्य महामार्ग जात आहेत. तसेच जव्हार वनविभागत पश्चिमवाडा, कंचाड व पुर्ववाडा वनक्षेत्रात खाजगी मालकी तसेच सरकारी जंगल खैर वृक्षांचे प्रमाण मोठया प्रमाणात आहे. अवैधरित्या साग व खैर वाहतुक करणे रोखण्यासाठी पश्चिमवाडा वनक्षेत्रात वाडा व देसाई येथे स्थायी स्वरुपाचे नाके आहेत. तसेच विक्रमगड वनक्षेत्रातील पोचाडा येथे संरक्षण कुटी उभारण्यात आली आहे. जव्हार व डहाणू वनविभागात उपलब्ध असलेल्या क्षेत्रीय कर्मचारी वृंदाकडून नियमीत रात्रगस्त करणे, नाकाबंदी करुन वाहनांची तपासणी करणे, फिरते पथकाकडून संवेदनशिल क्षेत्राचे वनांची तपासणी करणे, आवश्यकतेनुसार राज्य राखीव पोलीस दलाच्या मदतीने धाडी टाकून वनोपज जप्त करणे इत्यादी प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जातात. वनविषयक बाबींची जागृती होऊन स्थानिक लोकांचे सहकार्य व मदत मिळणे अत्यंत महत्वाचे असल्याने स्थानीक लोकांनी वनाविषयी आस्था व सामाजीक दायीत्व विषयक प्रोत्साहीत करण्याकामी गाव परिसरामध्ये भिंतीपत्रके बॅनरच्या माध्यमातुन वनसंपत्तीचे रक्षण करण्यासंदर्भात जनजागृती केली जाते. वनविभागचे क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून त्यांच्या कार्यक्षेत्रातील गावाचे पोलीस पाटील, सरपंच तसेच वनप्रेमी इसम यांना विश्वासात घेऊन वन अपराधाबाबत माहिती देण्याऱ्यांना योग्य बक्षीस देण्यात येईल असे आव्हान करण्यात आलेले आहे. तसेच संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या माध्यमातून अवैध वृक्षतोड, वन्यप्राणी, अतिक्रमण, वनवणवा, अवैध चराई व इतर वनगुन्हे याबाबत जनजागृती करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दिंडोरी ( जि. नाशिक) येथील लखमापूर –कोशिंबे या मार्गावरील हॉटेलमध्ये बनावट दारुची विक्री होत असल्याबाबत**

**(४५) ६१८३० (१९-०४-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिंडोरी (जि.नाशिक) तालुक्यातील लखमापूर कोशिंबे या मार्गावर असणा-या हॉटेलमध्ये बनावट दारु विक्री होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दारुमुळे अनेकांना आपले प्राण गमवावे लागले असतांना जिल्ह्यात बनावट दारु विक्रीचे प्रकार निदर्शनास येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,त्यानुषंगाने कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, ,

(४ ) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शंभूराज देसाई (०२-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

दिंडोरी तालुक्यातील लखमापूर-कोशिंबे या मार्गावर हॉटेल कोकणी दरबार मध्ये बेकायदेशीरपणे मद्य विक्री होत असल्याचे आढळून आल्यामुळे दि.३०.०१.२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

या ठिकाणी झालेल्या मद्य विक्रीमुळे जिवीत हानी झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि, जिल्ह्यात ६ ठिकाणी बनावट मद्यविक्री होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) हॉटेल कोकणी दरबार येथे अवैध मद्यविक्री होत असल्याचे आढळून आल्यामुळे संबंधितावर महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून रु.५,७८,५५०/- इतक्या रक्कमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात नाशिक जिल्ह्यात बनावट मद्य तयार करुन विक्री करणाऱ्यांविरुद्ध व अवैध मद्य विक्री करणाऱ्या हॉटेल व ढाब्यांवर अनुक्रमे ६ व ५१२ गुन्हे नोंद करण्यात आले असून प्रकरणाशी संबंधित इसमांवर कारवाई करण्यात आली आहे. काही प्रकरणी मा. न्यायालयांने संबंधितांना द्रव्यदंड ठोठावला आहे. तसेच सराईत गुन्हेगारांकडून चांगल्या वर्तणूकीचे बंधपत्र घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात "मिलेट मिशन" साठी २०० कोटी रुपयांची तरतूद केल्याबाबत**

**(४६) ६१८६१ (२०-०४-२०२३). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शेखर निकम (चिपळूण), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरा करण्याचे ठरविले असताना "मिलेट मिशन" साठी रुपये २०० कोटींची तरतुद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये तृणधान्य प्रक्रीया उद्योजकांना अर्थसहाय्य पंतप्रधान सूक्ष्म अन्न प्रक्रीया, मुख्यमंत्री अन्न प्रक्रीया योजना व स्मार्ट प्रकल्प यांची अभिसरण करण्यात आली असून तृणधान्य पिकांचे उत्पादन व त्यांची विक्री यांची मूल्य साखळी विकसित करण्यासाठी सदरचे रुपये २०० कोटींची तरतूद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी घोषित करण्यात आलेले रुपये २०० कोटी तृणधान्य प्रक्रीया उद्योग, पंतप्रधान सुक्ष्म अन्न प्रक्रीया, मुख्यमंत्री अन्न प्रक्रीया व स्मार्ट योजनांचे अभिसरण (Convergence) करुन देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सद्य:स्थितीत सुरु असलेल्या या योजनांची अनुदानाची रक्कम एकत्र करुन शासनाने रुपये २०० कोटी घोषीत करुन शेतकऱ्यांच्या डोळ्यात धूळफेक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, वरील सर्व योजना व्यतिरीक्त शासन या मिलेट मिशनसाठी रुपये २०० कोटीची वेगळी तरतूद अर्थसंकल्पात करण्यात येण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (३१-०५-२०२३) :**(१) (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष २०२३ च्या निमित्ताने राज्यात महाराष्ट्र श्री अन्न अभियान राबविण्याबाबत मा.उपमुख्यमंत्री यांनी अर्थसंकल्पीय भाषणामध्ये केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने राज्यातील कार्यान्वित असलेल्या योजनांमधून पौष्टिक तृणधान्यांचे उत्पन्न, उत्पादकता वाढ, बियाणे मिनीकीट वाटप, पिक प्रात्यक्षिके, पौष्टिक तृणधान्य संबंधित अन्न प्रक्रिया उद्योग इत्यादीसाठी तसेच सोलापूर येथे "श्री अन्न उत्कृष्टता केंद्र" राज्यात स्थापन करण्यास दि.१७ एप्रिल, २०२३ च्या शासन परिपत्रकान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाढवण बंदर,बुलेट ट्रेन बडोदा एक्सप्रेस या प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या भूमिपूत्रांनी पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढल्याबाबत

**(४७) ६२१४१ (२१-०४-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विनाशकारी वाढवण बंदर, बुलेट ट्रेन बडोदा एक्सप्रेस या प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या भूमिपूत्रांनी दिनांक ३० जानेवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी मुलांच्या नावावर ७५ हजार बोगस प्रमाणपत्र तयार केल्याप्रकरणी ती रद्द करण्यात यावी तसेच गायरान जमिनीवरील भूमाफियांनी अतिक्रमणे हटविण्यात यावी, अशा अनेक मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०६-२०२३) :**(१) होय.
(२), (३) व (४) आदिवासी मुलांच्या नावावर ७५ हजार बोगस प्रमाणपत्र तयार केल्यामुळे ती रद्द करण्यात यावी, अशा आशयाची तक्रार आदिवासी विकास विभागास प्राप्त झालेली नाही. तथापि, अनुसूचित जमाती प्रवर्गातील व्यक्तींना अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देणे व अशा प्रमाणपत्राची पडताळणी करणे या बाबींचे विनियमन करण्याकरिता "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० व महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ लागू केले आहे. सदर अधिनियम व नियमातील तरतूदीनुसार वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते.
गायरान जमिनीवरील अतिक्रमणाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्वाधिकारे (Suo moto) जनहित याचिका क्र. ०२/२०२२ दाखल केली होती. सदर जनहित याचिकेमध्ये मा. न्यायालयाने दिनांक ०६.१०.२०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार महसूल व वन विभाग, शासन पत्र, दिनांक ११.१०.२०२२ अन्वये गायरान जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत ठोस उपाययोजनांचा जिल्हानिहाय कालबद्ध आराखडा तयार करण्याचे निर्देश सर्व विभागीय आयुक्त यांना देण्यात आले होते. उक्त निर्देशाच्या अनुषंगाने पालघर जिल्ह्यामध्ये गायरान जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करण्याची कार्यवाही सुरु होती. तथापि, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी उक्त जनहित याचिकेमध्ये

अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबतच्या त्यांच्या दिनांक ०६.१०.२०२२ रोजीच्या आदेशास दिनांक २७.०२.२०२३ पर्यंत अंतरीम स्थगिती दिलेली होती. त्यामुळे अतिक्रमण निष्कासित करण्याची कार्यवाही तात्पुरती स्थगित करण्यात आली होती.

तदनंतर मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २७.०२.२०२३ रोजीच्या आदेशाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ५० नुसार सदर अतिक्रमणे दूर करण्याची कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहे. त्यानुसार, अतिक्रमणे निष्कासनाची कार्यवाही करण्याची तजवीज जिल्हाधिकारी यांनी ठेवली आहे.

---

**राज्यात महाज्योतीमार्फत इतर मागास प्रवर्ग विद्यार्थ्यांसाठी टॅब वाटप करण्याची योजना बंद झाल्याबाबत**

**(४८) ६२१७२ (२०-०४-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाज्योतीमार्फत इतर मागास प्रवर्ग विद्यार्थ्यांसाठी टॅब वाटप करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच सध्या राज्यात महाज्योतीमार्फत इतर मागास प्रवर्ग विद्यार्थ्यांसाठी टॅब वाटप करण्याची राबविण्यात येणारी योजना बंद केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजना बंद करण्याची कारणे काय आहेत व योजना सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (३०-०५-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चामोर्शी तालुक्यातील तहसील कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीस मंजुरी देवून निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४९) ६२६३६ (२१-०४-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चामोर्शी (जि.गडचिरोली) तालुक्यात १९९५ पूर्वी बांधकाम करण्यात आलेली तहसील कार्यालयाची प्रशासकीय इमारत जिर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्याच्या बहुतांश ठिकाणी नवीन महसूल प्रशासकीय भवन झाले असून चामोर्शी सारख्या मोठ्या महसुलाच्या ठिकाणी तहसील कार्यालयाची इमारत नाही, त्यामुळे तहसील कार्यालयाचे कामकाज दुसऱ्या इमारतीमधून सुरू करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्यातील नवीन प्रशासकीय इमारतीला मंजुरी देऊन शासन निधी उपलब्ध करून देणार आहे काय, तसेच याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०२-०६-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) चामोर्शी जिल्हा गडचिरोली येथील तहसिल कार्यालयाच्या इमारत बांधकामाकरीता उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चामोर्शी, यांनी इमारतीचे अंदाजपत्रक तयार करुन तांत्रिक मान्यता घेऊन जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्यामार्फत शासनास प्रस्ताव सादर करण्याची बाब कार्यवाहीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील शेतकऱ्यांच्या शेतजमीनी अधिग्रहीत करण्याबाबत**

**(५०) ६३०८५ (२१-०४-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील वेकोली क्षेत्रातंर्गत भटाळी खदान विस्तारीत करुन त्यामध्ये वेकोलीनी मौजा पायली, भटाळी, किटाळी, चिंचोली, चक तिरंवजा येथील एकूण क्षेत्रफळ ५११ हेक्टर आर जमीन संपादन करणार आहे, मात्र मौजा तिरवंजा मोकासा येथील एकही जमिन अधिग्रहीत करण्यात येत नसल्यामूळे बाधित शेतकऱ्यावर अन्याय झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेकोलीनी भटाळी खदान सुरू करतांना जेव्हा केव्हा अधिग्रहणाची वेळ येईल तेव्हा मौजा तिरवंजा मोकासा गावातील जमिनी पहिल्यांदा संपादीत करू असे आश्वासन देऊन गावामधून मोठया प्रमाणात कोळशाची वाहतूक सूरू करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,त्यानुषंगाने तिरवंजा मोकासा परिसरातील जमिन संपादीत करण्याबाबत कोणती कार्यवाही उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०८-०६-२०२३) :** (१), (२) व (३) केंद्र शासनाच्या कोळशा मंत्रालयाने भटाळी खदान करीता कोल बेअरिंग ॲक्ट, १९५७ च्या कलम ९ नुसार दिनांक १७.०३.२०२३ अन्वये मौजा पायली भटाळी, चिंचोली, किटाळी व चक तिरवंजा येथील ४७९.९१ हे.आर. इतकी खाजगी जमीन व ३०.७७ हे.आर. इतकी शासकीय जमीन अशी एकूण ५१०.६८ हे.आर. इतकी जमीन संपादित करणेबाबत अधिसूचना प्रसिध्द केली आहे. परंतु मौज तिरवंजा मोकासा येथील जमीनी कोळसा खाणी करीता सदयस्थितीत संपादित करण्याचा प्रस्ताव नाही. वेस्टर्न कोल फिल्ड, चंद्रपुर यांनी भटाळी खदान सुरु करतांना जेव्हा केव्हा अधिग्रहणाची वेळ येईल तेव्हा मौजा तिरवंजा मोकासा गावातील जमीनी पहिल्यांदा संपादित करु असे कुठेही आश्वासन दिलेले असल्याची बाब अभिलेखा वरुन दिसुन येत नाही. सदयस्थितीत एकूण उत्पादनाच्या ८०% कोळसा हा महाजनको द्वारा बंद पाईप लाईन कन्वेहर द्वारा वाहतुक करण्यात येते. तसेच मौजा तिरवंजा मोकासा या गावातुन कोळशाची वाहतुक सुरु आहे. मौजा तिरवंजा मोकासा परिसरातील जमीनी संपादित करण्याबाबत कोणताही प्रस्ताव संबधीत यंत्रणेकडून जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे कार्यालयास प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.